# भारतीय 'काळा पैसा'वाल्यांची नावे उघड करणार-ज्युलियन अंसाज

(पान ३ वर)

" नात विश्वासाचे "
SIDDHARTH BUILDERS & DEVELOPERS
कार्यालय :- ८ डी, म्हात्रे निवास, गावदेवी, मुंबई : २३८५१६१३/१४

# सामसत्ता
॥ सामर्थ्य महाराष्ट्राचे ॥

"पुढील अंकात वाचा"

...खळबळजनक वृत्तांत...

लाखो लोकांना, काही हजार कोटी रुपायांचा गंडा घालणाऱ्या 'ट्विंक्ल ग्रुप ऑफ कंपनी'च्या कारभाराचा भांडाफोड!!!

* वर्ष : २ * अंक : २९ ते ३३ * R.N.I No. MAHMAR/ 2010/34286 * संपादिका : रोहिणी बापूराव काणे * मुंबई * गुरुवार दि. ०२.०२.२०१२ * किंमत : ३ रूपये * पाने : ८ *

## 'आयओए'वरून कलमाडींना हाकला-टायटलर



नवी दिल्ली : (सी.एन.आय)

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा गैरव्यहार प्रकरणी तिहारवारी केलेले खासदार सुरेश कलमाडी यांना भारतीय ऑलिंपिक संघटना (आयओए) अध्यक्षपदावरून गचांडी धरून हाकला, अशी आक्रमक मागणी 'आयओए'चे उपाध्यक्ष आणि कॉंग्रेस सेवादलाचे अध्यक्ष जगदीश टायटलर यांनी केली आहे. यापूर्वी, केंद्रीय क्रीडामंत्री अजय माकन यांनीदेखील कलमाडी यांना हटविण्याची मागणी केली होती. कलमाडींच्या हकालपट्टीची मागणी करणारे टायटलर हे कॉंग्रेसचे सरचिटणीसही आहेत. क्रीडाविश्वाणत भारताची मान शरमेने झुकवणारे कलमाडी यांची तातडीने 'आयओए'च्या अध्यक्षपदावरून हकालपट्टी करावी, अशी मागणी जगदीश टायटलर यांनी केली आहे. 'राष्ट्रकुल' गैरव्यवहाराच्या मुळाशी कलमाडी असून, भारतीय क्रीडा क्षेत्राला वाकुल्या दाखवत ते 'आयओए'च्या अध्यक्षपदावर कायम आहेत. याबाबत केवळ सौम्य भाषेतील निवेदने देऊन चालणार नाही. राजीनामा (पान ४ वर)

## 'टगेगिरी' म्हणजे 'गुंडगिरी' नव्हे!

कुडाळ (सी.एन.आय)

उपमुख्यमंत्री अजित पवार यांना कोण विचारतो ? त्यांची 'टगेगिरी' कोकणात खपवून घेतली जाणार नाही, असा इशारा नारायण राणे यांनी राष्ट्रवादीच्या वस्त्रहरणासाठी आयोजित सभेत बोलताना दिला. यावेळी बोलताना नारायण राणेंनी उपमुख्यमंत्र्यांवर अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन गंभीर आरोप केले आहेत. त्यांनी केवळ अजित पवारच नाहीतर आर.आर.पाटील, खा. सुप्रिया सुळे, आ. दिपक केसरकर, राज्यमंत्री भास्कर जाधव यांच्यावरही अत्यंत गंभीर स्वरुपाचे आरोप केलेले आहेत. या प्रकारामुळे राजकियदृष्ट्या पुर्णपणे वस्त्रहिन झालेल्या त्रिमुर्ती (नारायण-निलेश-नितेश)यांनी स्वत:च्या पायावर भला धोंडाच पाडून घेतला आहे. मुळातच कणकवली लिमिटेड झालेल्या नारायण राणेंनी यापुढे आयुष्यात कधीही महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होण्याचे स्वप्न पाहू नये. कॉंग्रेससाठी अवघड जागेचे दुखणे ठरत असलेले राणे हे कुडाळच्या वस्त्रहरण नाट्यानंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री सोडाच, २०१४ नंतर एखाद्या फुटकळ खात्याचे मंत्री देखील होतील की नाही या बद्दल राजकिय वर्तुळात शंका व्यक्त केली जात आहे, तशा प्रकारची कुजबुज कॉंग्रेसमध्ये सुरु झाली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवारांना कोण विचारतो हे म्हणत असताना राणेंनी आपण कोठे आहोत याचा देखील विचार केला नाही. अजित पवार सध्या महाराष्ट्राचा मुख्यमंत्री होण्याची स्वप्न पाहतात, पण मी त्यांना मुख्यमंत्री होऊ देणार नाहीत, अशी गर्जना या सभेत राणेंनी केली. मात्र त्याचवेळी स्वत: व्यतिरिक्त दुसऱ्याला निवडुन आणण्याची हिंमत नसलेले नारायण राणे, अजित पवारांचा अश्वमेध ते कसा रोखणार? पवार (पान ६वर)

## नेतृत्वाच्या खुजेपणामुळेच शिवसेनेचा 'आनंद' हरपला?



मुंबई : (सी.एन.आय)

आनंद परांजपे यांना मात्र शिवसेनेनं दोन वेळा खासदार केलं. ठाणे, कल्याण, डोंबिवलीतल्या शिवसैनिकांनी परांजपे यांच्या विजयासाठी प्रामाणिक प्रयत्न केले. जिल्हाप्रमुख एकनाथ शिंदे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अहोरात्र मेहनत घेऊन परांजपे यांना निवडून आणले. त्यामुळे ते शिवसेनेला दगा देतील असे कुणाला स्वप्नातही वाटले नव्हते. मात्र, जे स्वप्नातही शक्य नाही, ते मीच घडवून आणू शकतो! हे शरद पवार यांनी पुन्हा एकदा सिद्ध करून दाखवले. शिवसेनेनं एवढं भरभरून दिल्यानंतरही परांजपे यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेसची वाट का धरली यामागे शिवसेना नेतृत्वाचा खुजेपणाच कारणीभूत आहे. केवळ भावाच्या लग्नाची पत्रिका राज ठाकरे यांना दिली या शुल्लक कारणावरून कार्याध्यक्ष उध्दव ठाकरे यांनी परांजपे यांच्याशी अबोला धरला होता. परांजपे यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमांना जाण्याचे ते टाळत होते. शिवसेनेसारख्या मोठ्या पक्षाची धुरा खांद्यावर असलेल्या उद्धव ठाकरे यांनी या फुटकळ गोष्टीत न अडकता संघटनेत ऊर्जा फुंकण्याची जी ताकद नेत्यामध्ये लागते ती आपल्याकडे आहे, हे कृतीतून सिध्द करायला हवे होते. पण दुर्दैवाने तसा प्रयत्न त्यांनी आजवर तरी केलेला नाही. शरद पवार यांच्यासारखा ज्येष्ठ नेता प्रकृती ठीक नसतानाही सलग पाच तास एका जागेवर ठाण मांडून पक्षातील कार्यकर्त्यांच्या आणि पदाधिकाऱ्यांच्या व्यथा एकून घेतो. परंतु, उध्दव ठाकरेंना संघटना बांधण्यासाठी मेहनत घेणारे कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांशी गप्पा माराव्यात, त्यांची दुखणी जाणून घ्यावीत, काही नाही तर निदान त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप तरी मारावी, असे कधी वाटत नाही. अशी खंत (पान ४ वर)

## जोगेश्वरीत इंदूमिलची पुनरावृत्ती होणार !
## ६५ एकर जागेसाठी मुस्लिम आक्रमक?



मुंबई : (सी.एन.आय)

जोगेश्वरीतील ६५ एकर जागेसाठी मुस्लिम समाजातील नेत्यांनी नवा मोर्चा उघडण्याची तयारी सुरू केली आहे. दलित नेत्यांनी ज्या पद्धतीने इंदु मिलची जागा बळकाविण्याचा प्रयत्न केला, त्या धर्तीवर जागा मिळवावयाची की अन्य मार्ग पत्करावयाचा यादृष्टीने पडद्यामागे जोरदार हालचाली सुरू आहेत.

स्वातंत्र्यापूर्वी (१९१०मध्ये) इस्माईल युसूफ यांनी त्यांच्या मालकीची जागा वक्फला दिली होती. या जागेचा वापर मुस्लिम समाजाच्या विकासासाठी काम करणाऱ्या संस्थांना करू द्यावा, असेही त्यांनी आपल्या पत्रात नमूद केले होते. या ६५ एकरपैकी ४२ एकर सध्या मोकळी आहे. उर्वरित जागेवर लोकांनी अतिक्रमण केले असून, काही जागा बिल्डरांच्या घशात गेली आहे तर काही जागांवर सरकारी इमारती बांधण्यात आल्या आहेत. पोलिसांच्या आणि पहेलवानांच्या संस्थेलाही जागा देण्यात आली. त्यामुळे सध्या मोकळी असलेली जागाही बिल्डर व दलाल (पान ४ वर)

## राज्यातील टोलधाडीविरुद्ध आंदोलन
## केवळ २ तासांत १७ हजारांचा गल्ला

सातारा : (सी.एन.आय)

राज्यात टोलवसुलीत जनतेची होणारी लूट थांबण्यासाठी २६जानेवारीपासून राज्यातील सर्व टोलनाक्यांवर वाहनगणना अभियान सुरू करण्यात आले आहे. याची सुरुवात पुणे-नगर महामार्गावरीलपेरणे (ता. हवेली) टोलनाक्यापासून करण्यात आली, अशी माहिती बंडातात्या कराडकर यांनी दिली. या वेळी महाराष्ट्र राज्य वारकरी महामंडळाचे सचिव नरहरीमहाराज चौधरी, मधुकरअण्णा टेमगिरे, उत्तमराव भोंडवे, अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे जिल्हाध्यक्ष रमेश टाकळकर, प्रमोद मोहोळ, शशिकांत चंगेडे, विजय सागर, सुखलाल संघवी, लखन नलगे, हेमंत माधव, खेडकर, प्रीतेश लाड व अनेक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या वेळी बंडातात्या कराडकर म्हणाले, की वाहनगणती राज्यातील सर्व टोलनाक्यांवर करण्यात येणार असून, त्यापोटी मिळणारी वसुली रक्कम रोज जाहीर करण्यात येणार (पान ४ वर)

## केंद्रात आगामी १५ वर्षे आघाडीचीच : शरद पवार



मुंबई : (सी.एन.आय)

केंद्रात आगामी दहा-पंधरा वर्षांत कोणत्याही एका पक्षाला पूर्ण बहुमत मिळेल, असे आपल्याला वाटत नाही. केंद्रात आघाडीचेच राजकारण राहील, असे मत राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त केले. २०१४ मधील लोकसभेची निवडणूक आपण लढणार नाही, असे त्यांनी एका खाजगी वाहिनीला मुलाखत देताना स्पष्ट केले. पुढील काळात कॉंग्रेस किंवा भाजपा या दोनपैकी एका पक्षाच्या नेतृत्वाशिवाय सरकार बनणार नाही. त्यांच्यापैकी एकाचा बाहेरून पाठिंबा घेणारे सरकार टिकणार नाही, ते देशाला स्थैर्यदेखील देऊ शकणार नाही, असे मत व्यक्त करून पवार यांनी तिसऱ्या आघाडीच्या प्रयोगाची शक्यता फेटाळली. मी पक्षीय जबाबदारी वा काम मी नक्कीच सोडणार नाही. १९६७ मध्ये आमदार म्हणून निवडून आल्यापासून ४५ वर्षे मी संसदीय राजकारणात आहे. आता निवडणूक न लढता (पान ४ वर)

।। सुविचार ।।

माणूस पाप करतो हे एक वेळ क्षम्य आहे. पण पापाचे समर्थन करतो त्यावेळी ते अक्षम्य आहे.

## संपादकिय

# भारतीय प्रजासत्ताकात खरंच प्रजेची सत्ता आहे ?

जगातल्या सर्वात मोठ्या लोकशाही राष्ट्रात-म्हणजे भारतीय प्रजासत्ताकात खरंच प्रजेची सत्ता आहे? राज्य प्रजासत्ताक असले तरी, प्रत्यक्षात मात्र सत्ता प्रजेची नाही.२६ जानेवारी १९५० रोजी भारतीय राज्यघटना जनतेनेच राष्ट्राला अर्पण केली. या घटनेनुसार या लोकशाहीत सामान्य जनता हीच सार्वभौम आणि सर्वसत्ताधीश आहे. केंद्र आणि राज्य सरकारांच्या अधिकारांची वाटणीही घटनाकारांनी संघराज्याच्या रचनेत करून ठेवली. सामाजिक-आर्थिक समता, हा घटनेचा मूलभूत पाया होता. अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण या मूलभूत गरजांची पूर्तता प्रजासत्ताकात जनतेच्या इच्छेनुसार व्हावी, अशी घटनाकारांची अपेक्षा होती. जगातल्या संसदीय लोकशाही राज्य व्यवस्थांचा, घटनांचा अभ्यास करून घटना समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि घटना समितीने आदर्श अशी नवी राज्यघटना देशाला अर्पण केली. घटनेतल्या तरतुदी सर्वसामान्यांचे कल्याण करणाऱ्या, त्यांच्या हिताची-हक्कांची जपणूक करणाऱ्या असल्या तरीही या घटनेची अंमलबजावणी कशी होते, यावरच तिचे यश अवलंबून असल्याचे डॉ.आंबेडकर यांनी ही घटना देशाला बहाल करताना केलेल्या भाषणात सांगितले होते. पण याच डॉ. आंबेडकरांना हिंदू महिलांना समान सामाजिक-धार्मिक हक्क देणाऱ्या हिंदू कोड बिलाला संसदेनेच केलेला विरोध अनुभवावा लागला.

देशात समान नागरी कायदा अंमलात आणावा, अशी तरतूद घटनेत असतानाही त्याची अंमलबजावणी करायची हिंमत केंद्रातल्या सरकारला होत नाही. मतांचा जोगवा मागायला सोकावलेल्या आणि सत्तेला हपापलेल्या राजकीय पक्षांना असा कायदा अंमलात आणल्यास अल्पसंख्याकांची मते आपल्या पक्षापासून दुरावतील, अशी भीती वाटते. सर्वोच्च न्यायालयाने मुस्लीम घटस्फोटित महिलांना फौजदारी दंड संहितेतल्या तरतुदीनुसार पोटगीचा अधिकार मान्य केला होता. पण याच अल्पसंख्याकांचे लांगुलचालन करणाऱ्या कॉंग्रेसच्याच सरकारने घटना दुरुस्ती करून, मिळालेल्या हक्कापासून मुस्लीम महिलांना वंचित केले. महिलांना विधानसभा आणि लोकसभेत पन्नास टक्के आरक्षणाच्या तरतुदीचे विधेयक गेली वीस वर्षे संसदेत मांडले जाते आणि रद्दबातल होते. महिलांना सामाजिक न्याय द्यायचा येळकोट करणाऱ्या बहुतांश राजकीय पक्षांनीच हे विधेयक हाणून पाडायसाठी कट-कारस्थाने केली आणि ती अद्यापही सुरूच आहेत. प्रजासत्ताकात महिलांना समान राजकीय अधिकार नाकारले जात असतील तर, हे प्रजासत्ताक फक्त पुरुषांच्या राजकीय वर्चस्वासाठीच स्थापन झाले आहे काय? याचा खुलासा राजकारणी करीत नाहीत.

भारतीय प्रजासत्ताकाला भ्रष्टाचार, लाचखोरी, गुन्हेगारीच्या रोगाने ग्रासले. त्याचा आता भस्मासूर झाला.सत्ताबाजांनीच भ्रष्टाचाऱ्यांना, गुन्हेगारांना संरक्षण दिले ते सत्तेच्या राजकारणासाठीच! गुंड, मवाली आणि सराईत गुन्हेगारही उजळ माथ्याने राजकीय पक्षाची उमेदवारी मिळवतात. बडे नेते त्यांच्या पाठीशी राहतात. पैसा, संपत्ती आणि दहशतीच्या बळावर निवडणुका लढवून हे गुंड, मवाली निवडून येतात. त्यातले काही मंत्री होतात. वाढत्या गुन्हेगारीपासून लोकशाहीची मुक्तता करायला हवी, गुंडांना निवडणूक लढवण्यास बंदी घालायची तरतूद लोकप्रतिनिधी कायद्यात करावी, अशी मागणी केंद्रीय निवडणूक आयोगाने केंद्र सरकारकडे करूनही काही उपयोग झालेला नाही. निवडणुकांत पैशाचा प्रचंड वापर होतो, ही बाब खुद्द निवडणूक आयोगानेच मान्य केली आहे. निवडणुकीतला पैशाचा हा वाढता वापर म्हणजे, लोकशाहीला गंभीर धोका आहे, अशी कबुली सत्ताधारी आणि विरोधी पक्षही देतात. पण त्यासाठीही लोकप्रतिनिधी कायद्यात महत्वपूर्ण तरतुदी-दुरुस्त्या करायला मात्र त्यांची तयारी नाही. भ्रष्टाचाराचा रोग तर दिल्लीपासून गल्लीपर्यंत फोफावला. भ्रष्टाचाराचे विषारी बीज रूजले, त्या विषवृक्षाची फळे पुढाऱ्यांना नव्हे, तर सार्वभौम जनतेलाच सक्तीने खावी लागतात. जनतेला लाचेची, भ्रष्टाचाराची विषबाधा होते. गरीब जनतेची निर्लज्जपणे पिळवणूक करणाऱ्या प्रशासनातल्या लाचखोरांना त्याची शरम वाटत नाही. पोलीस, महसूल आणि अन्य सरकारी खात्यात चिरीमिरी दिल्याशिवाय कामेच होत नाहीत, असा सामान्य जनतेत निर्माण झालेला समज सार्वत्रिक अनुभवामुळेच होय! देशात लाखो कोटी रुपयांचा भ्रष्टाचार दरवर्षी होतो. लाखो कोटी रुपयांचा काळा पैसा स्विस बँकांत ठेवला जातो. जनतेच्या या लुटारूंच्या मुसक्या आवळून तुरुंगात डांबाण्यासाठी, त्यांची मालमत्ता जप्त करण्यासाठी व्यापक अधिकार असलेल्या लोकपाल विधेयकाला मंजुरी द्यायची केंद्र सरकारची तयारी नाही.

लोकशाहीत जनता ही सार्वभौम, सर्व सत्ताधीश असते. पण भारतीय प्रजासत्ताकमध्ये जनतेची सत्ता फक्त नामधारीच राहिली आहे. प्रशासन आणि सरकार, लोकप्रतिनिधी हे जनतेचे सेवक, पण प्रत्यक्षात मात्र नोकरशाही माजली, तीच सर्वसत्ता बळकाऊन बसली. तिच्यावर नियंत्रण ठेवण्यात सरकार अपयशी ठरल्यानेच, भ्रष्टाचाराच्या राक्षसाचे भस्मासुरात रुपांतर झाले. हे पाप फक्त कॉंग्रेसचेच नव्हे तर सर्वच पक्षांचे आहे. भारतीय प्रजासत्ताकात जनतेच्या आशा-आकांक्षाची पूर्तता करण्यापेक्षा, सत्तेने माजलेल्यांचा धुमाकूळ सुरू झाला आहे. पण निवडणुकीच्या वेळी हीच जनता सार्वभौम होते आणि मदांधांना-उन्मत्तांना धडा शिकवते. भारतीय प्रजासत्ताकाच्या संरक्षणाची जबाबदारी आता खऱ्या अर्थाने जनतेनेच स्विकारण्याची वेळ आली आहे.

# गरीबांच्या कळवळ्याची ढोंगबाजी चव्हाट्यावर!

( रोहिणी बापूराव काणे : एडिटिंग इनचार्ज-सी.एन.आय )

देशाला स्वातंत्र्य मिळून ६४ वर्षे उलटल्यावरही पदपथ आणि रस्त्यांच्या कडेला उघड्यावर झोपणाऱ्या लाखो गरीबांना रात्रीचा निवारा मिळत नसल्याबद्दल, सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारांची झाडाझडती घेतल्याने, सत्ताधाऱ्यांची गरीबांच्या कळवळ्याची ढोंगबाजी चव्हाट्यावर आली. गेल्या तीन वर्षात सर्वोच्च न्यायालयाने राजधानी दिल्ली आणि अन्य महानगरांसह देशातल्या अत्यंत गरीब, निराधारांना रात्रीचा निवारा द्यायसाठी, निवारागृह बांधायचे आदेश राज्य सरकारांना देऊनही काही उपयोग झाला नाही. या वर्षी कडाक्याच्या, हाडे फोडणाऱ्या थंडीमुळे उत्तर प्रदेशसह अन्यत्र दोनशेच्यावर गरीबांचे बळी गेले. रस्त्याच्या कडेला गारठून कुडकुडत झोपलेल्या या गरीबांच्या अंगावरची वस्त्रेही फाटकी तुटकी होती. उत्तर भारतातल्या बहुतांश राज्यात गेले दोन महिने थंडीच्या लाटेने सामान्य जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले. काही भागांचा तर दाट धुके आणि बर्फवृष्टीमुळे बाह्य जगाशी संपर्कही पूर्णपणे तुटला. थंडीमुळे सर्व व्यवहार ठप्प असल्याने, रोजची रोजीरोटी श्रमावरच मिळवणाऱ्या लाखो गरीबांच्या पोटांची खळगी काही भरत नाहीत. वृध्द आणि आजारी निराधारांची आठवणही राज्य सरकारांना नसल्यानेच, सर्वोच्च न्यायालयाने आदेश देऊनही या गरीबांना निवारा मिळाला नाही. राज्य सरकारांच्या या बेपर्वाईच्या, बेदरकार धोरणावर सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती दलबीर भंडारी आणि न्या. दीपक मिश्रा यांच्या खंडपीठाने सडकून ताशेरे मारले आहेत. या वर्षी मार्च महिन्यापर्यंत म्हणजेच आणखी दोन महिने थंडीची लाट कायम राहील, असा अंदाज हवामान खात्याने वर्तवल्याच्या पार्श्वभूमीवर न्यायालय राज्य सरकारांवर कडाडले आहे. राज्य घटनेच्या कलम २१ नुसार देशातल्या जनतेच्या जीविताचे रक्षण करायची मूलभूत जबाबदारी राज्य सरकारांचीच आहे. याच कलमान्वये कडाक्याच्या थंडीपासून निराधारांचे रक्षण करणे, ही सुध्दा राज्य सरकारांचीच जबाबदारी आहे. कोणताही निवारा नसल्यामुळे उघड्यावरच झोपणाऱ्या गरीबांचे रक्षण करणे यापेक्षा राज्य सरकारांना अन्य कोणतेही महत्वाचे काम असूच शकत नाही. राज्य सरकारांनी या आदेशाचे तातडीने पालन करावे, आपल्या राज्यातल्या निराधारांसाठी निवाऱ्यांची सुविधा करावी, त्यांचे प्राण वाचवावेत, असे खंडपीठाने बजावले आहे. उत्तर भारतातल्या जम्मू-काश्मीर, हरियाणा, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, राजस्थान, उत्तर प्रदेश आणि बिहार या राज्यात थंडीच्या काळात तात्पुरत्या निवाऱ्याची सोय तीन आठवड्याच्या आत करावी, असेही खंडपीठाला खडसावून सांगावे लागले. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी या संवेदनशील असतानाही, त्या राज्यात निवारे उभारायचे काम रखडले, याबद्दल आश्चर्य व्यक्त करून न्यायालयाने या राज्यात अवघे सहाच निवारे आतापर्यंत उभारल्याबद्दल संताप व्यक्त केला. मुळातच सर्वोच्च न्यायालयाला गरीबांच्या कोटकल्याणाचा येळकोट करणाऱ्या राज्य सरकारांना निराधारांसाठी निवारे उभारा, असे आदेश द्यायची वेळ येते, हीच शरमेची बाब होय! पण सत्ताधारी आणि विरोधी पक्षांना या निराधारांच्या गरीबांच्या मतावर आपले सत्तेचे राजकारण चालत नाही, त्यांची मते मिळाली नाहीत तरी फारसे काही बिघडत नाही असे वाटत असावे. त्यामुळेच निराधारांना कडाक्याच्या थंडीत लोटून, हे गरीबांचे सेवक निर्लज्जपणे जनतेलाच फसवित आहेत.

अन्न, वस्त्र आणि निवारा या गोरगरीब आणि सामान्य जनतेच्या मूलभूत गरजा असतानाही, स्वातंत्र्यानंतर सत्तेवर आलेल्या केंद्र आणि राज्य सरकारांनी

# 'ज्या जागा सोडल्यात त्या घ्या आणि आपटून पडा'

**विनायक मुरुडकर**

रामदास आठवले व दलित पँथरचा हतबल पँथर नामदेव ढसाळ मुंबई महापालिकांच्या निवडणुकांमध्ये पुरेशा जागा मिळाल्या नाही म्हणून ते शिवसेना व भाजपावर नाराज आहेत. इतक्या वर्षाच्या अनुभवानंतरही डोळे बंद ठेवून सदैव हात पसरण्याचे राजकारण करणाऱ्या या नेत्यांना वेगळी वागणूक मिळूच शकत नाही. कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस, सेना व भाजपा या राज्यातील चार प्रमुख पक्षांपैकी कोणताही पक्ष असो, हे पक्ष व त्याचे नेते पक्के व्यवहारी आहेत. ते आपल्या पक्षीय स्वार्थासाठी रा.सु.गवई, आठवले, ढसाळ, प्रकाश आंबेडकर व जोगेंद्र कवाडे आदी दलित नेत्यांना चुचकारतात. या नेत्यांना जवळ करण्याने आपल्या पक्षाचा किती फायदा होईल याचा अंदाज घेऊन मुख्य राजकीय पक्षांचे नेते या दलित नेत्यांना जागांचे चतकोर तुकडे फेकतात. कारण मुख्य राजकीय पक्षांच्या नेत्यांनी या दलित नेत्यांचे पाणी जोखलेले आहे. 'आम्हाला हव्या त्या जागा मिळाल्या नाहीत,' असे रामदास आठवले यांची तक्रार होती, पण हव्या त्या जागा मिळण्यासाठी नेत्याचे आणि पक्षाचे पुरेसे बळ असावे लागते नि ते सुध्दा तुम्ही ज्या आघाडीशी वा युतीशी घरोबा करता, त्यांच्या नेत्यांना मान्य हवे. 'ज्या जागा सोडल्या त्या घ्या आणि आपटून पडा' अशी तर सेना-भाजपाची भूमिका नाही ना' अशी शंका नामदेव ढसाळ यांनी व्यक्त केली आहे. हेच रामदास आठवले यांनी वेगळ्या शब्दात सांगितले आहे. ते असे 'सेना-भाजपाचे उमेदवार निवडून येत नाहीत अशा बऱ्याच 'पडिक' जागा आरपीआयच्या पदरात टाकण्यात आल्या आहेत' असे आठवले यांचेही मत आहे. यात नवीन ते काय? ढसाळांनी फक्त पाच जागा मागितल्या. आठवले यांनी त्यांच्या कोट्यातील दोन जागा दिल्या. मागितलेल्या तीनपैकी सेना-भाजपाने एकही जागा दिलेली नाही.आठवले-ढसाळ या दोघांनी पत्रकार परिषदेपुरते एकत्र येण्याने दलित नेत्यांच्या ऐक्याची मोट कायम आहे, असा आभाससुध्दा निर्माण होऊ शकत नाही. 'ढसाळ यांनी त्यांचे उमेदवार दाखवावे, तेवढ्या जागा देतो', असे सेना-भाजपाने नव्हे तर, रामदास आठवले यांनी हिणवले आहे. ज्या आठवले यांनी पुण्यात एका जागेवरून ढसाळांशी युती तोडली त्यांचे ऐक्य यावर जागृत व सुज्ञ दलित जनता मुळीच विश्वास ठेवणार नाही. तसेच नामदेव ढसाळ यांची दलित पँथर मुंबईत सेना-भाजपाबरोबर तर पुणे व पिंप्री चिंचवडला कॉंग्रेससोबत ही त्यांची भुमिका विचित्र व संधिसाधूपणाची आहे. रामदास आठवले यांचेही राजकीय आयुष्य असेच गेले असल्याने त्यांनी ढसाळांच्या या विसंगत समझोत्याचे त्यांनी समर्थन केले आहे. 'सेना-भाजपाला जेथे नगण्य मते मिळाली आहेत त्या जागा आम्हाला दिल्या. (पान ६वर)

# भारतीय 'काळा पैसा'वाल्यांची नावे उघड करणार-ज्युलियन असांज

नवी दिल्ली : (सी.एन.आय)

जगभरातील बँकांमध्ये असलेल्या भारतीय खातेदारांची नावे आपण पुढील वर्षी जाहीर करू, असे विकिलिक्सचे संस्थापक ज्युलियन एसांजे यांनी नुकतेच दिल्ली येथे पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले आहे.




परदेशातील बँकामध्ये कोणत्या काळा पैसा वाल्या भारतीयांची खाती आहेत याची माहिती विकिलिक्सकडे आहे, परंतु पुढील वर्षी ती जाहीर करण्यात येणार आहे, असे सांगून असांजे यांनी सीबीआयची माहिती चीनमधील हॅकरकडून चोरली जात आहे, असा दावा त्यांनी केला. भारताशी संबंधित इतर संवेदनशील माहितीदेखील परदेशी संस्था काढून घेत आहेत. या संदर्भात आपल्याकडे ठोस पुरावा आहे. एवढेच नाही तर भारताची दूरसंचार प्रणालीदेखील त्यादृष्टीने असुरक्षित बनली आहे. यावेळी ज्युलियन असांजे याने जीमेल, फेसबुक या कंपन्यांवर आरोप करताना म्हटले आहे की, या कंपन्यांनी आपल्या ग्राहकांची माहिती खुलेआम विकली आहे. मोठ्या प्रमाणातील ग्राहकांची माहिती एक गठ्ठा स्वरुपात विकणे हा सध्या अब्जावधी डॉलरचा उद्योग झाला असून, या कंपन्या कोणत्याही देशातील गुप्तचर संघटनांना माहिती पुरवत आहेत. या माहितीच्या आधारे या कंपन्या अब्जावधी डॉलर कमावत आहेत. ही माहिती काही वेळा संबंधित देशातील गुप्तचर संघटनांना तसेच लोकशाही व हुकुमशाही सरकारच्या पुरविण्यात येत असल्याचे म्हटले आहे. असांजे म्हणतो, काही कंपन्या ग्राहकांची माहिती मिळवण्यासाठीच स्वत: तयार केलेले हॅण्डसेट विकतात. त्याद्वारे मिळालेली ग्राहकांची माहिती संबंधित कंपन्या इतर कंपन्यांना पुरवतात. त्यानंतर या कंपन्या पुढे माहिती देतात. याबाबत उदाहरण देताना त्याने सांगितले की, नोकिया सिमेन्सची एक उपकंपनी ट्रोवीकरचा वापर बहारीन देशातील नागरिकांची गुप्त माहिती मिळविण्याकरिता केला जात होता. ही माहिती उजेडात येताच मोठा वाद झाला. त्यानंतर नोकिया सिमेन्सने ही कंपनी २००९ मध्ये विकून टाकली. असांजे याने केवळ ब्लॅकबेरी, ॲपल आणि फेसबुकवरच आरोप केले नाहीत तर त्याने ग्राहकांची खासगी माहिती विकणाऱ्या १६० कंपन्यांची नावे जाहीर केली आहेत. विकिलिक्सने आपल्या वेबसाईटवर २८७ पानांच्या एका अहवालात या कंपन्यांचा उल्लेख केला. त्यांनी पुढे असेही स्पष्ट केले की,



चीनच्या हॅकर्सनी भारतीय तपास यंत्रणेच्या (सीबीआय)सायबर नेटवर्कमध्ये घुसखोरी केली होती. हॅकर्सनी सीबीआयच्या डाटा नेटवर्कमध्ये घुसखोरी करुन महत्त्वाची माहिती चोरली होती. याबाबत आपल्याकडे पुरावे असून, चीनची गुप्तचर संघटना सीबीआयच्या ईमेलवरुन माहिती मिळवत होती, असेही ज्युलियन असांजे याने नवी दिल्लीतील एक इंग्रजी वर्तमानपत्राच्या कार्यक्रमात आरोप केला.

# विद्यमान खासदारही संपर्कात, पण निवडणुकीच्या काळात पक्षप्रवेश नाही- अजितदादा



मुंबई : (सी.एन.आय)

धनंजय मुंडे, आनंद परांजपे यांच्या पाठोपाठ एक खासदार शनिवारी राष्ट्रवादीत प्रवेश करणार असल्याचे विधान प्रदेशाध्यक्ष मधुकरराव पिचड यांनी केले असले तरी निवडणुकीच्या काळात त्यांचे पक्षांतर करू नये, अशी माझी वैयक्तिक भूमिका असल्याचे सांगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी, एक माजी खासदार उद्या पक्षात येऊ शकतो, असे सूचित केले. काही विद्यमान खासदार संपर्कात असले तरी फोडाफोडीमुळे त्याची उलटी प्रतिक्रिया उमटते हे लक्षात आल्याने घाई करू नये, असा सूर राष्ट्रवादीत उमटला आहे. शनिवारी सकाळी १० वाजता एक खासदार राष्ट्रवादीच्या मुख्यालयात पक्षप्रवेश करणार आहे, असे सांगलीच्या मेळाव्यात बोलताना पिचड यांनी जाहीर केले. पिचड यांच्या विधानामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली. हा खासदार कोण, याचीच चर्चा सुरू झाली. मग तो शिवसेना, भाजप की काँग्रेसचा यावर तर्कवितर्क सुरू झाले. शिवसेनेचे दोन खासदार कधीही पक्षांतर करू शकतात, असा दावा राष्ट्रवादीच्या वतीने केला जात आहे. फोडाफोडीच्या राजकारणाबद्दल 'लोकसत्ता' शी बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मात्र एक माजी खासदार उद्या पक्षात प्रवेश करणार असल्याचे सांगितले. काही विद्यमान खासदार आमच्या संपर्कात आहेत. राष्ट्रवादीच्या व्यासपीठावर येण्याची त्यांची तयारीही आहे. पण निवडणुकीच्या काळात पक्षांतर झाल्यास त्याचीच चर्चा होते. यामुळेच निवडणुका संपेपर्यंत कोणत्याही विद्यमान खासदाराचा पक्षप्रवेश किंवा पक्षाच्या व्यासपीठावर आणू नये, अशी आपली भूमिका असल्याचे अजितदादांनी स्पष्ट केले. खा. आनंद परांजपे यांनी पक्षाध्यक्ष शरद पवार यांची भेट घेतल्यानंतर आणखी काही खासदारांनी त्याच पद्धतीने पक्षाध्यक्षांची भेट घेण्याची तयारी दर्शविली आहे, अशी माहिती त्यांनी दिली. दरम्यान, हिंगोलीचे माजी खासदार शिवाजी माने यांनी राष्ट्रवादीमध्ये प्रवेश केला आहे.

खासदार-आमदारांचे पक्षांतर झाल्यास त्याची उलटी प्रतिक्रिया उमटते, असा अनुभव राष्ट्रवादीच्या नेत्यांना आला आहे. यामुळेच राष्ट्रवादीच्या नेत्यांनी इतर पक्षामधील फोडाफोडीबद्दल 'आस्ते कदम' भूमिका घेतल्याचे समजते.

# सुधारणा करा, पण देश कोसळावयास नको-राष्ट्रपती



मुंबई : (सी.एन.आय)

सक्षम लोकपाल विधेयकासाठी नागरी संस्थांकडून जोरदार मागणी होत असतानाच कोणत्याही सुधारणा करताना देशाची मूलभूत यंत्रणा कोलमडणार नाही, याची काळजी घेण्याचे निर्देश राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांनी केंद्र सरकारला दिले. प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्राला उद्देशून त्या बोलत होत्या. राष्ट्रपती म्हणाल्या, की काही सुधारणा अत्यावश्यक झाल्या आहेत. परंतु, या सुधारणा करताना आपण चांगल्या यंत्रणा मोडकळीस काढणार नाही, याची दक्षता घ्यावी लागेल. झाडाला लागलेल्या अनेक फळांत काही खराब आहेत. ही फळे पाडून टाकताना झाडच कोसळणार नाही, याची काळजी घ्यावी, असेही राष्ट्रपतींनी सांगितले. राष्ट्रपतींच्या भाषणाचा स्पष्ट रोख ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या आंदोलनाकडे होता. परंतु, त्यांनी त्यांचे थेट नाव घेण्याचे टाळले. देशाला लोकशाहीचा दीर्घ अनुभव आला असून, अनेक दबावगटांच्या दबावानंतरही चांगले लोकशाही मूल्य असलेले राष्ट्र म्हणून आपण उभे आहोत. एखादे ध्येय निश्चित करताना येणारा दबाव हा क्षणिकच असतो, परंतु त्याचे दूरगामी परिणाम आपण लक्षात घेतले पाहिजेत, असेही राष्ट्रपतींनी स्पष्ट केले. आपली न्यायसंस्था, प्रसारमाध्यमे यांची भूमिका ही देश उभारणीत महत्त्वपूर्ण असून, सर्व यंत्रणांनी त्यांचे (पान ६वर)

# मुंबईकर महायुतीला 'घालवून दाखवणार' -राजहंस सिंह

मुंबई : (सी.एन.आय)



मुंबई शहराच्या विकासासाठी राज्य शासन तसेच केंद्र शासनाने हजारो कोटी रुपयांच्या योजना राबविण्यास सुरुवात केली आहे. मोनो रेल, मेट्रो रेल्वे प्रकल्प, एमएमआरडीएच्या माध्यमातून मुंबईतील रस्त्यांचा विकास, महामार्गाचा विकास अशी अनेक कामे राज्य शासनाने मुंबईसाठी केली आहेत. महापालिकेत गेली १५ वर्षे सत्तेत असलेल्या शिवसेना-भाजपच्या अभद्र युतीने मुंबईची पुरती वाट लावली आहे. सेना-भाजपच्या भ्रष्ट सत्तेला मुंबईकर आज कंटाळले आहेत. पालिकेत विरोधी पक्षनेता म्हणून मी युतीच्या कारभाराचे अनेकदा वाभाडे काढले. 'करून दाखवले'ची जाहिरातबाजी शिवसेना आज करत असली, तरी उदया मुंबईकर मतदारराजा यांना 'घालवून दाखवणार' आहे, असे मुंबई महापालिकेतील विरोधी पक्षनेते व आमदार राजहंस सिंह यांनी सांगितले. काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी मुंबईत प्रचंड बहुमताने सत्तेत येईल आणि मुंबईचा खऱ्या अर्थाने विकास करेल, असा विश्वासही सिंह यांनी व्यक्त केला. मुंबई शहराचे विकासाचे अनेक प्रश्न सुटावेत यासाठी वेळोवेळी पालिकेतील विरोधी पक्ष म्हणून काँग्रेस व राष्ट्रवादीच्या नगरसेवकांनी आवाज उठवला तसेच मुख्यमंत्र्याकडे पाठपुरावा केला आहे. दुर्दैवाने पालिकेत सत्तेत असलेल्या शिवसेना-भाजपने विकासाच्या मुद्दयावरही साथ न दिल्यामुळे मुंबईत अनेक नागरी समस्या कायम आहेत. मुंबईची लोकसंख्या वाढत असून पाणी प्रश्न सोडविण्यात युती अपयशी ठरली. केवळ पुरेशा पाण्याचाच प्रश्न नाही, तर साधे शुद्ध पाणीही आज युती मुंबईकरांना देऊ शकत नाही. कंत्राटदारांशी हातमिळवणी करून मुंबईच्या रस्त्यांची सेना-भाजपने पुरती वाट लावली आहे. दर पावसाळ्यात मुंबईच्या वाहतुकीचा बोजवारा उडतो. रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ते असा प्रश्न मुंबईकरांना पडतो, तरीही याचा खेद व खंत यांना नाही. आता याच खड्डयांमध्ये मुंबईकर सेना-भाजपला (पान ६वर)

# नाबार्डतर्फे कोअर बँकिंग प्रणाली

मुंबई : (सी.एन.आय)

राज्यातील; तसेच केंद्र सरकारच्या सहकारी बँकांतून कोअर बँकिंग प्रणाली राबवली जावी यासाठी नाबार्डने पुढाकार घेतला आहे. एकूण १४० सहकारी बँकांतून हा उपक्रम राबवला जाणार आहे. यातील पहिल्या टप्प्यात राज्यातील चार केंद्रीय सहकारी बँकांनी कोअर बँकिंग प्रणाली राबवण्यासाठी विप्रो कंपनीबरोबर करार केला आहे. सर्व सहकारी बँकांसाठी एकच तंत्रज्ञान वापरले जाणार आहे.

राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक अर्थात नाबार्डने सहकारी बँकांतून कोअर बँकिंग प्रणाली राबवण्यासाठी पुढाकार घेतला आहे. ही प्रणाली सुरू करण्यासाठी १४० बँकांची निवड करण्यात आली असून, या बँका महाराष्ट्रासह अन्य राज्यांतीलही आहेत. विप्रो कंपनीशी करार केलेल्या बँकांमध्ये राज्यातील लातूर, कोल्हापूर, बुलढाणा आणि नागपूर येथील केंद्रीय सहकारी बँकांचा समावेश आहे. विप्रो कंपनी या बँकांसाठी प्रणालीचा पुरवठादार म्हणून भूमिका बजावणार आहे.

पतपुरवठ्याचा वेग वाढावा आणि सर्वसमावेशक आर्थिक विकासाला गती मिळावी या मुख्य उद्देशाने नाबार्ड हा उपक्रम राबवत आहे. १४० बँकांमध्ये कोअर बँकिंग प्रणाली (पान ६वर)

## ढोंगबाजी चव्हाट्यावर...

त्यांची पूर्तता करायसाठी योजनाबध्द कार्यक्रम आखला नाही. त्याची पूर्तताही केली नाही. सत्ता मिळवाण्यासाठी गरिबी हटाओच्या घोषणा दिल्या. सत्ता मिळाल्यावर मात्र त्या कोट्यवधी गरीबांची सत्ताधाऱ्यांना आठवणही राहिली नाही. पुढच्या निवडणुकीपर्यंत गरीबांना आश्वासनांचे पाणी पाजण्यापलिकडे हे सत्तांध काहीही करीत नसल्यानेच, सर्वोच्च न्यायालयाला त्यांची परखड शब्दात हजेरी घ्यावी लागली. या आधीही केंद्र सरकारच्या गोदामात सडून जाणारे लक्षावधी मेट्रिक टन धान्य गरीबांना मोफत वाटा, असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला होता. पण आम्ही धान्य सडवू, कुजवू, उंदीर-घुशींनी ते फस्त केले तरी चालेल, पण गरीबांना मात्र ते मोफत देता येणार नाही, असे धोरण जनहिताचा कळवळा दाखवणाऱ्या सरकारने घेतले. मुक्त आणि उदारमतवादी अर्थव्यवस्थेच्या धडाकेबाज अंमलबजावणीनंतर गेल्या वीस वर्षात गरीब आणि श्रीमंतातली आर्थिक दरी प्रचंड वाढली. खुद्द राजकारण्यांनाही संपत्ती आणि पैशाच्या हव्यासाचा भस्म्या रोग जडला. आम्ही गरीबांसाठीच राजकारण करीत आहोत, असे निर्लज्जपणे सांगत आलिशान मोटारीतून फिरणाऱ्या आणि गरीबांनाच वाऱ्यावर सोडणाऱ्या राजकीय टोळ्या देशाच्या सर्व भागात अगदी खेड्यापाड्यापर्यंत वाढल्या. आपण, आपले कुटुंब आणि सग्यासोयऱ्यांचे कोटकल्याण करायसाठीच आपल्याला सत्ता मिळाल्याच्या मस्तीत अनेक राजकारण्यांनी लाखो-कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केला. माजी दूरसंचार मंत्री ए. राजा यांनी केलेला एक लाख सत्तर हजार कोटी रुपयांचा स्पेक्ट्रम घोटाळा, राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांत सुरेश कलमाडी यांनी केलेला शेकडो कोटी रुपयांचा घोटाळा, ही गेल्या दोन वर्षातली ठळक उदाहरणे आहेत. सत्तेचा वापर करून किती पैसा खावा, किती संपत्ती मिळवावी, मालमत्ता जमा करावी, याचे भान खाबूगिरीला सोकावलेल्या सत्तेच्या दलालांना राहिलेले नाही. देशातील ४३ टक्के जनता अर्धपोटी राहते, याची पर्वा त्यांच्याच जीवावर सत्ता मिळवणाऱ्यांना नाही. जाहीर सभासमारंभातून गरीबांच्या कल्याणाचा उदो उदो करायचा, मतांचा जोगवा मागायचा आणि सत्ता मिळाल्यावर त्याच गरीबांची उपेक्षा करायची, असे लोकहितविरोधी राजकारण देशाच्या सर्व भागात रूजले आहे. गुंड आणि गुन्हेगार, मवाली, राजरोसपणे निवडणुका लढवतात, त्यातले काही गणंग निवडून येतात. मंत्रीही होतात आणि तेच गुंड जनतेला त्यागाचे डोस पाजतात. गरीबांनी त्याग करायचा आणि सत्तेच्या मक्तेदारांनी पालखीत बसायचे, बाकीच्यांनी त्यांच्या पालख्या उचलायच्या, असा स्वार्थी राजकारणाचा उद्योगच फोफावला. परिणामी अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजांपासून सामान्य आणि गोरगरीब जनता वंचित राहिली. पावसाळ्यात लाखो आदिवासींचे-त्यांच्या बालकांचे कुपोषण सुरुच राहिले. कुपोषणामुळे लाखो गरीबांचे बळी जायला लागले. तरीही निगरगट्ट सत्ताधिशांना त्याची काही लाज-लज्जा वाटत नाही. आरोग्य आणि शिक्षण याही मूलभूत गरजांची पूर्तता राज्य सरकारे करीत नाहीत. राजकारण्यांची संवेदनशीलता हळूहळू कमी होत गेली. माणुसकी पारखी झाली. त्यामुळेच तुम्ही जनतेसाठी आहात, गरीबांना थंडीत तरी निवारा द्या, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाला द्यावे लागले. भारतीय लोकशाहीचे आणि जनतेचेही केवढे हे दुर्दैव!

## शिवसेनेचा 'आनंद' हरपला?

अनेक शिवसैनिक खाजगीमध्ये सातत्याने बोलून दाखवत आहेत. एवढे सायास करुन कदाचित न भेटणारा देव देखील भेटतो, पण शिवसैनिकांना त्यांचे उद्धट साहेब भेटत नाहीत.

खा. आनंद परांजपे यांना पक्षाने थोडा जरी मानसन्मान दिला असता तर आज शिवसेनेची एवढी नाचक्की झाली नसती. शिवसेनेशी एकनिष्ठ असलेल्या अनेकांच्या डोक्यात शिवसेनेच्या बदललेल्या राजकारणाविषयी तिडीक आहे. मातोश्रीच्या किचन कॅबिनेटमध्ये शिरून कान भरणाऱ्यांची चलती असून पक्ष वाढीसाठी झटणाऱ्यांना येथे किंमत नाही, असा संदेश संघटनेत गेलेला आहे. मातोश्रीने आत्मपरीक्षण करून वेळीच आपल्या भूमिका बदलल्या नाहीत तर येत्या दोन-तीन वर्षात शिवसेनेचे दिग्गज नेतेही अन्य पक्षाच्या आश्रयाला गेलेले दिसतील. नाहीतरी ४ ते ५ खासदार व १३-१४ आमदार निवडणुकीनंतर केव्हाही राष्ट्रवादीमध्ये जाऊ शकतात असे खात्रीलायक सुत्राकडून समजते. सामसत्ताकडे त्यांची नावेही आहेत, पण महाराष्ट्र टाईम्स सारखा प्रकार घडू नये म्हणून आम्ही ती येथे छापत नाही.

शिवसेना कार्याध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी ज्या बेफिकीरीने आनंद परांजपे यांना दूर लोटले. तेवढ्याच आत्मियतेने शरद पवारांनी त्यांना जवळ घेतले. दूरगामी राजकारणात परांजपेरूपी प्यादे आपल्या कामाचे आहे, हे पवारांनी बरोबर हेरले होते. पालिका निवडणुकांच्या तोंडावर खा.आनंद परांजपे यांना राष्ट्रवादीत घेण्याचे कोणतीही पूर्वनियोजन नव्हते. योग्य संधी आल्यावर हे प्यादे सरकविण्याची खेळी पवारांना करायची होती. कदाचित त्यांनी ती चाल खेळलीही नसती. मात्र, दहा पंधरा दिवसांपासून शिवसेनेने राष्ट्रवादीतील असंतुष्टांना गळाला लावण्याचा सपाटाच लावला होता. त्यामुळे डॉक्टरांनी आराम करण्याची सक्त ताकीद दिलेली असतानाही पवार स्वत: या राजकीय युध्दात उतरले. आव्हाडांसह ठाण्यातल्या कोणत्याही नेत्याला साधी कुणकुणही लागू न देता पवारांनी परांजपे यांचा पत्ता ओपन करून सेनेला जबरदस्त हादरा दिला. पालिका निवडणुकीत आव्हाडांना नामोहरण करण्याचा शिवसेनेचा डाव होता. काही नेत्यांचा तो व्यक्तिगत अजेंडाही होता. मात्र, पवारांच्या खेळीनंतर तो डाव शिवसेनेवरच उलटला आहे. पवारांच्या प्रशस्तीपत्रकामुळे आव्हाड यांच्याविरोधात कुरघोडी करण्याच्या प्रयत्नात असलेल्या मंडळींनाही चपराक मिळाली आहे. त्यामुळे बॅकफूटवर गेलेले आव्हाड आज फ्रंटफूटवर आले असून निवडणुकांच्या पहिल्या टप्प्यात आघाडी घेणारी शिवसेना आता काहीशी बचावात्मक पवित्र्यात गेली आहे. पालिका निवडणुकांच्या रणधुमाळीवर त्याचे परिणाम निश्चितच दिसतीलच. परांजपे यांच्याकडून झालेल्या अपमानाचा बदला घेण्याची आक्रमक रणनीती शिवसेनेने आखली आहे. तर, आव्हाडही दोन हात करण्यासाठी सज्ज झाले आहेत.या निवडणुकीत अनेकांच्या राजकीय भवितव्याचा फैसला त्यात होईल. पक्षांतर्गत धुमसणाऱ्या असंतोषातून कदाचीत मोठी उलथापालथही होईल. पण ती नेमकी शिवसेनेत होते की राष्ट्रवादीत हे निकालानंतरच समोर येईल.

## टोलधाडीविरुद्ध आंदोलन

आहे. वाहनगणतीसंदर्भात माहिती अधिकारातून मिळालेल्या माहितीपेक्षा जास्त पटींनी वसुली होत आहे. यासाठी सर्व टोलनाक्यांवरची आकडेवारी एकत्र करून याचा अहवाल शासनास सादर करण्यात येणार आहे.

ही वाहनगणना मोहीम २ फेब्रुवारी पर्यंत चालणार आहे. ८० स्वयंसेवक कार्यरत राहणार आहेत. ही गणती करताना सत्यतेसाठी शासनाकडे प्रतिनिधी स्वयंसेवकांबरोबर देण्याची मागणी करण्यात आली होती; परंतु यास शासनाकडून आताही प्रतिसाद मिळाला नाही. बंडातात्या कराडकर यांच्या नेतृत्वाखाली चालू झालेल्या वाहनगणती मोहिमेत वारकरी संप्रदाय, अखिल भारतीय किसान संघ, सजग नागरिक मंच पुणे, भारत स्वाभिमान, नागरिक कृती मंच अहमदनगर, ग्राहक संघ अहमदनगर, व्यसनमुक्त युवक संघ, भ्रष्टाचार निर्मूलन समिती, युवा भारत लोकशासन आंदोलन, दी पूना डिस्ट्रिक्ट मोटार गुड्स टान्स्पोर्ट आदी संघटना सहभागी होत्या. पहिल्या २ तासांत वाहनगणतीतून होणारी टोलवसुली रक्कम स्वयंसेवकांनी जाहिर केली. यामध्ये सर्व प्रकारची वाहने मिळून २ तासांत ९७ हजार ८१२ एवढे उत्पन्न जाहिर करण्यात आले.

## आगामी १५ वर्षे आघाडीचीच

पक्षात मार्गदर्शन करावे, असे मला वाटते. राज्यसभेत जाण्याची माझी इच्छा नाही पण तो निर्णय पक्षाचा असेल, असे यावेळी त्यांनी सांगितले.

डॉ. मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वातील 'यूपीए २' मध्ये विसंवाद, गोंधळ दिसतो का, या प्रश्नात ते म्हणाले की, पहिले सरकार (यूपीए १) मजबूत नव्हते पण त्या सरकारची एकूण कामगिरी चांगली होती. यूपीए २ मध्ये आघाडीतील घटक पक्षांशी सुसंवाद ठेवणारी यंत्रणा अद्याप कार्यरत झालेली नाही. त्याचे परिणाम भोगावे लागत आहेत. यूपीए २ मध्ये काँग्रेसचे मंत्री अधिक आहेत. रणनीती ठरविण्यासाठीचा कोअर ग्रुप हा काँग्रेसचाच आहे. त्यामुळे काय निर्णय झाले ते आम्हाला बरेचदा टीव्ही चॅनेल्सवरून समजते, असा टोलाही पवार यांनी हाणला. विरोधी पक्ष काही शत्रू नसतात. इंदिराजींच्या वा वाजपेयींच्या काळातही विरोधकांशी चर्चा करून अनेक प्रश्नांवर मार्ग काढला जात असे. सत्ता किंवा अधिकाराचा वापर न करता तसे केले जाऊ शकते, असे पवार म्हणाले.

राहुल गांधी हे पंतप्रधान म्हणून आपल्याला मान्य असतील का, या थेट प्रश्नात पवार म्हणाले, तसा कुठलाही प्रस्ताव आमच्यासमोर आलेला नाही. २०१४ च्या निवडणुकीत काँग्रेसकडे आवश्यक संख्याबळ असेल तर आमच्या मताचा प्रश्नच येणार नाही. आमच्या मताची वेळ आली तर व्यापक राष्ट्रीय हित लक्षात घेऊन आम्ही निर्णय घेऊ. येत्या पाच वर्षात विविध पक्षांमध्ये नवे नेतृत्व आलेले असेल. विशेषत: काँग्रेसमध्ये नवीन चांगले नेतृत्व तयार होताना आपल्याला दिसते. अर्थात, सामान्य माणसात मिसळणारे, त्यांच्याशी समरस होणारे नेतृत्व टिकाव धरेल, असे मत पवार यांनी व्यक्त केले.

## इंदूमिलची पुनरावृत्ती होणार !

गिळंकृत करण्याची शक्यता आहे.

या जागेचा वापर मुस्लिमांच्या विकासासाठी काम करणाऱ्या शिक्षण संस्था व अन्य संस्थांच्या विधायक कार्यासाठी करण्यात यावा. २५ एकर जागा इस्माईल युसूफ यांच्या नावावर चालणाऱ्या शिक्षण संस्थेला देण्यात यावी. इस्माईल युसूफ कॉलेजचे माजी विद्यार्थी, इस्माईल परिवारातील सदस्य आणि हिंतचिंतकांना एकत्र आणावयाचे आणि या जागेचा तिढा मार्गी लावण्याचा प्रयत्न आहे. या जागेच्या संदर्भात निर्णय घेण्यासाठी मुंबई अमन कमेटीचे अध्यक्ष फरिद शेख यांच्या पुढाकाराने गेल्या आठवड्यात एक बैठक होणार होती. मात्र, काही महत्त्वाचे नेते शहराबाहेर असल्याने ही बैठक पुढे ढकलण्यात आली आहे.

या संदर्भात अधिक माहिती घेतली असता मुस्लिम समाजाचे असे म्हणणे आहे की, इंदू मिलची जागा सरकारची होती. ही जागा सरकारची नाही. जोगेश्वरी येथील जागा आमचीच म्हणजेच वक्फ बोर्डाची आहे. त्यामुळे आम्ही सरकारची जागा मागत नाही, तर आपलीच जागा रीतसरपणे मागत आहोत. ज्या हेतूसाठी ती जागा देण्यात आली होती त्या हेतूसाठी या जागेचा वापर झाला असता तर ती जागा आम्ही मागितलीही नसती. मात्र, मूळ हेतूच सफल होत नसल्याने आम्हाला समाजिक दायित्वाच्या भावनेतून पुढाकार घ्यावा लागत आहे. बॉम्बे स्टेटचे तत्कालिन गव्हर्नर आणि युसूफ इस्माईल यांच्यामधील कराराचे पालन नाही या ६५ पैकी मोकळी असलेली ४२ एकर जागेपैकी २५ एकर जागा इस्माईल युसूफ कॉलेजला दयावी. उर्वरित जागा शैक्षणिक परिसर म्हणून विकसित करावी अशी मागणी अमन कमिटीने केली आहे. निवडणुकीच्या तोंडावर इंदू मिलसारखा प्रकार या जागेच्या संदर्भातही घडू नये असे सरकार आणि पोलिसांनाही वाटते. त्यामुळे पोलीस सतर्क झाले आहेत.

## कलमाडींना हाकला.....

देत नसतील तर त्यांना (कलमाडी) गचांडी धरून काढावे. देशाची मान आणखी खाली जाणे परवडणारे नाही. जो कोणी त्यांना पाठिंबा देत असेल तोदेखील या लुटीमध्ये सहभागी आहे. अन्यथा कोणीही क्रीडाक्षेत्र आणि खेळाडूंचा अपमान करून कलमाडींना पाठिंबा देण्यास धजावणार नाही. क्रीडामंत्री अजय माकन यांच्याशी आपण अनेक गोष्टींबाबत सहमत नसलो तरी कलमाडींबाबत त्यांनी घेतलेल्या भूमिकेला आपले पूर्ण समर्थन आहे, असेही टायटलर यांनी आक्रमक भाषेत दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

राष्ट्रकुल गैरव्यवहार प्रकरणात संयोजन समितीचे अध्यक्ष राहिलेल्या सुरेश कलमाडी यांना अटक झाल्यानंतर 'आयओए'च्या अध्यक्षपदावरून त्यांना दूर करून नवा अध्यक्ष निवडला जावा, असा आदेश क्रीडा मंत्रालयाने गेल्या वर्षी एप्रिलमध्ये दिला होता. मात्र, अद्याप कलमाडी त्या पदावर आहेत. त्या पार्श्वभूमीवर टायटलर यांच्या मागणीमुळे आता नव्याने हा मुद्दा चर्चेत येण्याची शक्यता आहे.

## ओपिनियन पोल'वरही बंदी घाला!-कुरेशी



नवी दिल्ली, : (सी.एन.आय) मतदानाच्या तोंडावर प्रसिद्ध केले जाणारे ओपिनियन पोल हेसुद्धा 'पेड न्यूज'चाच प्रकार असल्याच्या तक्रारी आहेत असे सांगतानाच मुख्य निवडणूक आयुक्त एस. वाय. कुरेशी यांनी 'एक्झिट पोल'प्रमाणे 'ओपिनियन पोल'वरही बंदी घाला, अशी मागणी आज केली. 'निवडणूक सुधारणा' या विषयावरील एका चर्चासत्रात ते बोलत होते.

निवडणूक रिंगणातल्या उमेदवारांपैकी एकही उमेदवार लायक वाटत नसल्यास मतदारांना नकारात्मक मतदानाचा अधिकार दिला गेला पाहिजे असे मतही त्यांनी व्यक्त केले. कुरेशी यांनी निवडणुका नि:पक्षपाती व स्वच्छ वातावरणात पार पाडण्यासाठी या चर्चासत्रात काही सूचना केल्या.

*निवडणुकांत गैरप्रकारांचा अवलंब करणाऱ्या पक्षांची नोंदणी रद्द करावी.*निवडणुकांच्या सहा महिने आधीच सरकारी जाहिरातींवर बंदी घालावी तसेच मतदाराला स्वयंनिर्णयासाठी मतदानाला ४८ तास आधी उमेदवारांच्या जाहिराती बंद कराव्यात.* निवडणूक खर्चावरील मर्यादा निश्चित करून त्याची सक्त अंमलबजावणी करावी

# इराणच्या नाकेबंदीमुळे भारताची चिंता वाढली

नवी दिल्ली : (सी.एन.आय)

अमेरिका व युरोपीय समुदायाने इराणवर लादलेल्या बंधनांबाबत केंद्रीय वर्तुळात चिंता व्यक्त केली जात आहे. भारताच्या ऊर्जा सुरक्षेसाठी इराण किती महत्त्वाचा आहे, हे वॉशिंग्टनने समजावयास हवे, असे स्पष्ट मत परराष्ट्र सचिव रंजन मथाई यांनी अलीकडे व्यक्त केले.'फायनान्शियल टाइम्स'ला दिलेल्या मुलाखतीत मथाई म्हणाले, की जागतिक ऊर्जा बाजाराकडे पाहता, इराणला वगळून भारताला खनिज तेलाचे व्यवस्थापन करणे सहजासहजी शक्य होणार नाही.

अण्वस्त्रनिर्मितीच्या दिशेने चाललेल्या इराणच्या वाटचालीकडे पाहता, अमेरिका व युरोपीय समुदायाने इराणची नाकेबंदी करण्यास सुरवात केल्याने वातावरण तापले आहे. पाश्‍चत्त्य देशांनी सशस्त्र कारवाई करून इराणच्या खनिज तेल निर्यातीत अडथळा आणल्यास, होर्मुझची सामुद्रधुनी वाहतुकीस बंद करण्यात येईल, असा इशारा इराणच्या संसदीय परराष्ट्र खात्याचे व राष्ट्रीय सुरक्षा समितीचे उपप्रमुख महंमद कोसारी यांनी दिला आहे. या संदर्भात इराणच्या नौदलाने ओमानच्या आखातात सरावही केला.

होर्मुझची सामुद्रधुनी पशियन व ओमानचे आखात यांच्या मधोमध असून, ती अत्यंत निमुळती म्हणजे केवळ दहा किलोमीटरची आहे. तेथून जपान, भारत, दक्षिण कोरिया व चीन या देशांना खनिज तेलाचा ८५ टक्के पुरवठा करणाऱ्या जहाजांची वाहतूक होते. २०११ मध्ये खनिज तेलाच्या १७ दशलक्ष पिंपांची वाहतूक येथून झाली. खनिज तेलाची सर्वाधिक आयात भारत (प्रतिदिन ३७ हजार पिंपे) इराणमधून करीत असून, त्यासाठी वर्षाकाठी सुमारे १२ अब्ज डॉलर इराणला दिले जातात. ही रक्कम भारत चलनाच्या स्वरूपात देतो. तथापि, अमेरिकेने इराणची आर्थिक नाकेबंदी केल्याने डॉलरऐवजी वस्तुविनिमयाच्या स्वरूपात ती करण्याचा विचार केंद्र सरकार करीत आहे. इराणखालोखाल सौदी (पान ६वर)

# बहुजन विकास आघाडी राष्ट्रवादीत विलिन होणार?

मुंबई : (सी.एन.आय)

कल्याणचे सेनेचे खासदार आनंद परांजपे राष्ट्रवादीत आल्यानंतर ठाण्यातील आणखी एक खासदार आणि पक्षाचा अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये येणार असल्याचे विश्वसनीय सुत्रांकडून समजते. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष मधुकरराव पिचड सांगलीत येथे पक्षाच्या कार्यक्रमात बोलताना तसे संकेत दिले. एका पक्षाचा अध्यक्ष व एक खासदार उद्या राष्ट्रवादीत प्रवेश करणार असल्याचे सभेत त्यांनी जाहीर केले. यामध्ये बहुजन विकास आघाडीचे अध्यक्ष हितेंद्र ठाकून व खा. बळीराम जाधव हे त्यांच्या सर्व पक्षसदस्यासह म्हणजेच बहुजन विकास आघाडी राष्ट्रवादीमध्ये विलीन करण्याचे संकेत मिळत आहेत.

या वृत्ताला दुजोरा देताना बळीराम जाधव यांनी आपला पक्षांतराचा निर्णय झाला असून राष्ट्रवादीत जायचे की काँग्रेसमध्ये, याबाबतचा निर्णय आमचे सर्वेसर्वा व पक्षाचे अध्यक्ष हितेंद्र ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली घेतला जाईल. तसेच पक्षाचे सर्व पदाधिकारी या वेळी पक्षांतर करतील असे संकेत दिले आहेत.

मात्र याबाबत पक्षाध्यक्ष (पान ८वर)

# पत्रकार संरक्षण कायदा कागदावरच

मुंबई : (सी.एन.आय)

महाराष्ट्र टाइम्स वृत्तपत्रावरील शनिवारचा हल्ला हा काही एकमेव हल्ला नाही. राज्यभरात पत्रकार आणि प्रसारमाध्यमांवरील हल्ल्यांत वाढ होत आहे. असे असताना पत्रकारांना संरक्षण देणारा कायदा करण्यास काँग्रेस-राष्ट्रवादीप्रणित सरकार मात्र कचरत आहे.

दशकभरापूर्वी एका वृत्तपत्राच्या कार्यालयावर असाच हल्ला झाल्यानंतर प्रमुख वृत्तपत्रांचे संपादक आणि पत्रकार संघटना यांनी तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचे दरवाजे ठोठावत असे हल्ले रोखण्यासाठी विशेष कायदा करण्याची मागणी केली होती. मात्र विलासराव देशमुख यांच्याकडून कोणतेही आश्वासन मिळाले नाही. त्यांच्या नंतरचे मुख्यमंत्री सुशिलकुमार शिंदे यांनीही याप्रकरणी फारसा रस दाखवला नाही. २००८ मध्ये अशोक चव्हाण यांनी विलासराव देशमुख यांच्याकडून सूत्रे स्वीकारली आणि विशेष कायदा तयार करण्याच्या प्रस्तावाला काही प्रमाणात महत्त्व प्राप्त झाले. पत्रकारांवरील हल्ले रोखणाऱ्या कायदयाचा मसुदा तयार करण्यासाठी चव्हाण यांनी मुख्य सचिव आनंद कुलकणी ऱ्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केली होती.

कायदा आणि न्याय विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर चर्चेच्या अनेक फेऱ्या झाल्यानंतर कुलकणी ऱ्यांनी या कायदयाचा मसुदा तयार केला. डॉक्टरांवरील हल्ले रोखणाऱ्या कायद्याच्या धर्तीवर हा मसुदा होता. पत्रकार किंवा प्रसारमाध्यमांवरील हल्ले हे अजामीनपात्र गुन्हा म्हणून गणले जावेत, हल्लेखोर पक्षाकडून नुकसानभरपाई घेतली जावी आणि ही भरपाई प्रत्यक्षात झालेल्या नुकसानीच्या दुप्पट वसूल केली जावी, असा प्रस्ताव मसुद्यामध्ये मांडण्यात आल्याचे,एका (पान ८वर)

# मुंबई पोलिसांच्या अब्रुची लक्तरे वेशीवर?

मुंबई : (सी.एन.आय)

महानगरी मुंबईच्या झव्हेरी बाजार, ऑपेरा हाऊस, कबुतरखाना परिसरात १३ जुलै २०११ रोजी साखळी बॉंबस्फोट घडवणाऱ्या कटाचा सूत्रधार मुंबईतच तळ ठोकून राहत असतानाही, तो पळून गेल्याने मुंबई पोलिसांची बेअब्रु झाली. इंडियन मुजाहिद्दीन या दहशतवादी संघटनेचा सदस्य असलेल्या यासीननेच १३ जुलै रोजी पंधरा मिनिटांच्या अंतराने साखळी स्फोट घडवून २६ जणांचे बळी घेतले होते. त्या स्फोटात शंभर निरपराध जखमीही झाले होते. या स्फोटाचा तपास राज्य सरकारने राकेश मारिया यांच्या नेतृत्वाखालच्या विशेष चौकशी पथकाकडे सोपवला होता. या पथकाने गेल्या सहा महिन्यात सात संशयितांना अटक केली. पण या कटाचा म्होरक्या यासीन भटकळ त्याच्या दोन पाकिस्तानी साथीदारांसह भायखळ्यातल्या हबीब बिल्डिंग मधल्या तिसऱ्या मजल्यावरची खोली भाड्याने घेऊन राहिला होता. गेले सहा महिने तो याच खोलीत राहत असतानाही, पोलिसांनाही त्याचा ठावठिकाणा समजला नाही. दरम्यानच्या काळात त्याने दिल्लीच्या वाऱ्या करून मुंबई उच्च न्यायालयाच्या परिसरात बॉंबस्फोट घडवून तेरा जणांचे बळी घेतले. त्या स्फोटातही शंभर लोक जखमी झाले होते.

महाराष्ट्राच्या विशेष पोलीस चौकशी पथकाने भटकळची माहिती देणाऱ्या खबऱ्यालाच अटक केल्यामुळे तो सावध झाला आणि पळून जाण्यात त्याला यश मिळाल्याची धक्कादायक माहिती चव्हाट्यावर अलिकडेच आली. तीन दहशतवादी राजरोसपणे मुंबईत राहतात, दिल्लीत जाऊन स्फोट घडवतात आणि त्याची कसलीही माहिती मुंबई पोलिसांना मिळत नाही, ही बाब पोलिसांच्या कार्यक्षमतेच्या प्रतिमेला कलंक लावणारी ठरते. प्रसारमाध्यमांनी पोलीस खात्याच्या गलथानपणामुळेच (पान ८वर)

# पक्षापेक्षा स्वत:ला मोठे समजू नका- मुख्यमंत्री

कोल्हापूर : (सी.एन.आय)



''जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत आपली लढाई कोणाशी आहे याचे भान ठेवा. परस्परांतील मतभेद दूर ठेवा. पक्षापेक्षा स्वत:ला मोठे समजू नका'', अशा शब्दांत जिल्ह्यातील नेत्यांना मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी आज कानपिचक?या दिल्या. जिल्ह्यातील भ्रष्टाचा?यांची टोळी हद्दपार करून जिल्हा परिषदेची सत्ता एकहाती काँग्रेसला द्या,' असे आवाहनही त्यांनी मतदारांना केले.

शिरोली दुमाला (ता. करवीर) येथे झालेल्या काँग्रेसच्या प्रचार प्रारंभप्रसंगी ते बोलत होते. ''विधानसभा निवडणुकीत जिल्ह्यात झालेल्या काँग्रेसच्या पराभवाचा वचपा या निवडणुकीत काढा'', असे आवाहन माहिती व तंत्रज्ञान मंत्री विलासराव देशमुख यांनी केले.

जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीचा काँग्रेसचा पश्?चिम महाराष्ट्रातील प्रचाराचा प्रारंभ करताना मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी बोलताना ते पुढे म्हणाले, की ''कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व दिग्गज नेते आज एका व्यासपीठावर एका निर्धाराने एकत्र आले आहेत. या सर्व नेत्यांतील मतभेद मिटवत आणले आहेत. आता एकसंध वातावरण दिसत असले तरी यापूर्वी (पान ८वर)

# माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात भारत चीनच्या मागे

नागपूर : (सी.एन.आय)

भारताने १९९८ साली 'परम'सारखे सुपर संगणक तयार करून माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात अभूतपूर्व प्रगती केली होती. मात्र, त्यानंतर शासकीय अनुदान आणि विविध विभागांच्या असमन्वयामुळे या क्षेत्रात भारताला प्रगती करता आलेली नाही. आज या क्षेत्रात चीनने अतिशय प्रगती केली असून, भारताला बरेच मागे टाकले असल्याची खंत 'परम' सुपर संगणकाचे निर्माते व ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. विजय भटकर यांनी व्यक्त केली.

नागपूर येथे ते पत्रकारांशी बोलत होते. डॉ. भटकर म्हणाले, '१९८८ ते ९८ च्या काळात 'परम' हे सुपर संगणक आले. त्यासाठी तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी ३८ कोटींचा निधी दिला होता. त्यानंतर १९९८ ते २००८ या काळात संगणकक्षेत्रात अधिक प्रगती व्हायला हवी होती. यात प्रामुख्याने 'पेटा स्केल', 'एक्झा स्केल' सुपर संगणकांची निर्मिती होणे गरजेचे होते. मात्र, त्यासाठी प्रयत्न झालेले नाही. कारण यासाठीचे शासकीय अनुदान मिळणे बंद झाले. याशिवाय प्रकल्पासाठी विविध विभागांचा समन्वय राहिलेला नाही. त्यामुळे भारत गेल्या दहा वर्षांत माहिती तंत्रज्ञानात बराच मागे पडला.त्या तुलनेत चिनने आपल्या संगणक तंत्रज्ञानाचा विकास करून माहिती तंत्रज्ञानात अमेरिकेपेक्षाही जास्त प्रगती केलेली आहे. भारताला दहा वर्षांपूर्वीच्या 'पेटा स्केल' सुपर संगणकासाठी पाचशे कोटी शासकिय अनुदान हवे होते. केंद्र सरकारकडे याबाबत मागणी केली असताना, त्यांनी स्वत:च्या बळावर करण्याची बाब समोर केली (पान ६वर)

# पवार काका-पुतण्याच्या खेळीत 'युती' घायाळ

मुंबई : (सी.एन.आय)

दोन वर्षांनी म्हणजेच सन २०१४ मध्ये होणारी विधानसभा निवडणूक स्वबळावर लढायची आणि काँग्रेसबरोबर आघाडी झाली तरी सर्वाधिक जागा जिंकून मुख्यमंत्रीपद काबीज करण्याचा निर्धार करणाऱ्या अजित पवार यांनी आतापासूनच तसा सारिपाट मांडण्यास प्रारंभ केला आहे. धनंजय मुंडेंच्या माध्यमातून गोपीनाथ मुंडेंना धोबीपछाड दिली गेली असतानाच दुसरीकडे आनंद परांजपेंच्या रुपाने सेनेलाही धोबीपछाड दिली गेली. साम, दाम, दंड, भेद या सर्व मार्गांचा अवलंब करून राष्ट्रवादीचा विस्तार सुरू आहे. गोपीनाथ मुंडे यांच्या पुतण्याला फोडल्यावर त्या पाठोपाठ शिवसेनेचे कल्याणचे खासदार आनंद परांजपे यांना राष्ट्रवादीत आणून, शरद पवार यांनी युतीला जोरदार हादरा दिला. या नव्या घडामोडीमुळे राष्ट्रवादी विरुध्द युती असा संघर्ष महाराष्ट्रभर पेटलेला दिसणार आहे. महापालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकीत त्याचा प्रत्यय येणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमुळे राज्याचे राजकारण सध्या भलतेच तापले असून या तापलेल्या वातावरणात अनेकजण आपल्या राजकीय महत्त्वाकांक्षेच्या पोळ्या भाजून घेत आहेत. चांद्यापासून-बांद्यापर्यंत छोट्या-मोठया नेत्यांच्या पक्षांतराचे पेव फुटले आहे. सर्वच राजकीय पक्षांनी आपले दरवाजे-खिडक्या सताड उघड्या केल्या असून जो येईल त्याचे सन्मानाने स्वागत केले जात आहे. सोलापूरचे कुख्यात गुंड आणि कर्नाटकातल्या इंडीचे आमदार रवी पाटील यांना राष्ट्रवादीने पक्षात सामावून घेतले. तर धर्मवीर आनंद दिघे यांच्या निधनानंतर आनंद व्यक्त करणाऱ्या आ.सुभाष भोईर यांचे शिवसेनेत सन्मानाने स्वागत झाले. निवडणूक असल्याने इनकमिंग-आऊट-गोईंग फ्री असून तत्त्व, विचारधारा वगैरेंची सोवळी सर्वांनीच गुंडाळून ठेवली आहेत. 'कोणी गोविंद घ्या, कोणी गोपाळ घ्या' अशा या स्पर्धेत राष्ट्रवादी काँग्रेसने बाजी मारत शिवसेनेचे खासदार आनंद परांजपे आणि गोपीनाथ मुंडे यांचे पुतणे भाजपा आमदार धनंजय मुंडे यांना फोडून युतीला दोन जबरदस्त धक्के दिले आहेत. पुतणे अजित पवार यांनी आमदार फोडल्यावर शिवसेनेचा खासदार फोडून आपण (पान ८वर)

## राष्ट्रवादीचे वस्त्रहरण......

घराण्यांचा रोष ओढून घेतल्यानंतर काय होते. हे त्यांनी विलासराव देशमुखांना विचारुन पाहावे. अशी चर्चा राजकिय वर्तुळात आहे.

राष्ट्रवादीच्या वस्त्रहरणाची वल्गना करणाऱ्या नारायण राणेंना राष्ट्रवादीनेच आपले पुरते राजकिय वस्त्रहरण केले आहे, याचे भान नाही. त्यांचे खंदे समर्थकच त्यांना सोडून जात आहेत, त्यामुळे नारायण राणे पुरते सैरभैर झाल्याचे त्यांच्या कालच्या वक्तव्यावरुन दिसून येत होते. शिवसेनेला त्यागाचे धडे शिकविणारे नारायण राणे, त्यांच्याच कृपेमुळे राज्याच्या सर्वोच्चपदी बसले होते. दुसऱ्यांना नितिमत्तेचे धडे शिकविताना आपण त्यावर मास्टरी केली आहे, हे मात्र ते सोयिस्करपणे विसरले की काय? अशीच चर्चा उपस्थित लोकांमध्ये होती.

राष्ट्रवादी वस्त्रहरण नाटकात, नारायण राणे ज्या काँग्रेस संस्कृतीचा गोडवे गात होते, अजित पवारांचा जन्मच त्या काँग्रेस संस्कृतीत झाला आहे. पण राणेंचे काय? गुंडगिरी, खुन, मारामाऱ्या, तोडाफोडी व जाळपोळीचा वारसा लाभलेल्या शिवसेनेत ते वाढले आहेत. आजही आधूनमधून त्यांचा तो गुण उफाळून येत असतो. हे तेथील जनतेने अनुभवले आहे. राणेंनी कितीही दाखले देऊ देत, पण तेथील भळभळत्या जखमा कोकणीमाणुस उघडयाडोळयांनी पाहत आहे. त्यामुळे राणे बोलत असताना उपस्थित जनसमुदाय सस्मित होऊन मगरमच्छचे आसु कसे वगळतात हे अनुभवत होता. नारायण राणे वस्त्रहरण करणार म्हणजे नेमके काय करणार हे ऐकण्यासाठीच जनसमुदाय जमला होता. अजित पवारांची 'टगेगिरी' खपवून घेणार नाही असे सांगत असताना कोकणातील जनता नारायण राणेंच्या 'गुंडगिरी'ला पुरती विटली आहे, त्यामुळे जवळचे लोक त्यांना सोडून जात आहेत. स्वत:ला विकासपुरुष म्हणविणाऱ्या राणेंनी असे का घडते याचा अंतर्मुख होऊन विचार केला पाहिजे. अशीच चर्चा दबक्या आवाजात उपस्थित लोक करत होते.

मुळातच 'टगेगिरी' म्हणजे गुंडगिरीपेक्षाहि फार मोठे काहीतरी वाईट कृत्य आहे, असा अर्थ प्रसारमाध्यमांनी काढला. त्याचीच री आता सर्वच राजकिय पुढारी ओढत आहे. राणेही त्याला अपवाद ठरले नाहीत. मुळात 'टगेगिरी' म्हणजे 'गुंडगिरी' नव्हे, फार तर त्याला 'आरे ला कारे म्हणण्याची प्रवृत्ती ' म्हणता येईल. सर्वसाधारणपणे ग्रामीण भागात आपला मुलगा वेळेवर घरी आला नाही तर 'कुठे टग्यासारखा फिरत होतास?' असा प्रश्न बाप त्याला विचारत असतो. थोडक्यात घरचा कामधंदा न करता गावात फिरणे यालाच 'टगेगिरी' म्हणतात. याचसंदर्भाने अजितदादांनी राजकारण करणे हे 'टग्यां'चे काम आहे, असे म्हटले होते. मात्र अजितदादांबद्दल पुर्वग्रहदुषितपणा व आकस असणाऱ्या प्रसारमाध्यमांनी त्याचा विपर्यास केला. त्यांनी आपल्या भाषणात ग्रामिण बोलीभाषेतील नियमितपणे वापरला जाणारा शब्द वापरला होता. पण माध्यमांकडून त्याचा भलताच अर्थ काढला गेला. जसे काही 'टगेगिरी' ही 'गुडगिरी' पेक्षा काहीतरी भयंकर कृती आहे, असेच भासविण्याचा बाष्कळ प्रयत्न त्यांनी सुर केला आणि आजही तो सुरु आहे. प्रसारमाध्यमांनी कितीही पराचा कावळा केला तरी 'टग्या' म्हणजे नेमके काय असते हे महाराष्ट्रातील अस्सल मराठी माणसाला माहित आहे. त्यामुळे माध्यमांच्या कुत्सिपणाच्या टिकेचा जनतेवर काहीही परिणाम झाला नाही. उलट माध्यमांचेच पक्षपातीपणाचे रुप जनतेसमोर आले आहे. नारायण राणेंनीही वस्त्रहरण नाटयाची सुरुवातच 'टगेगिरी' चा दाखला देत सुरु केली.आणि ती कोकाणात चालणार नाही असे कितीही म्हटले तरी कोकणी माणसांना नारायण रावांच्या 'गुंडगिरी'पेक्षा अजितदादांची 'टगेगिरी'च जास्त भावली आहे. त्याचे प्रत्यंतर गेल्या निवडणुकीत तर आले आणि येत्या निवडणुकीतही दिसून येईलच.

नारायण राणे ज्या काँग्रेसमध्ये आहेत, त्या काँग्रेसला महाराष्ट्रात राष्ट्रवादीच्या मदतीशिवाय स्वबळावर केव्हाही सरकार स्थापता येणार नाही. त्यामुळे पवार कुटुंबियांवर चिखलफेक करुन, राष्ट्रवादीचे वस्त्रहरण करणाऱ्या नारायण राणेंनी भविष्यात त्यांच्या अंगावर कोणत्याही प्रकारचे राजकिय वस्त्र राहणार नाही याचीच तजविज करुन ठेवली आहे. अजितदादांना मुख्यमंत्री होऊ देणार नाही हे म्हणणाऱ्या नारायण राणेंना कदाचित ते उद्या साधे मंत्रीही होऊ देणार नाहीत, याची त्यांना जाणीव नसावी. पवारांच्या भुखंडाविषयी बोलणाऱ्या राणेंना देवस्थानचेही भुखंड पुरे पडले नाहीत,. नारायण राणे आपण एका गिरणी कामगाराचा मुलगा असल्याचे सांगतात. मुंबईत दोन लाख गिरणी कामगार होते. मग नारायण राणेंसारखी त्यांच्यापैकी किती जणांची मुले आता अब्जाधिश आहेत ? असाच प्रश्न उपस्थित काही गिरणी कामगार विचारताना दिसत होते.

नारायण राणेंचा चेंबुरच्या घाटला गाव ते कणवली असा प्रवासाचे आवलोकन केल्यानंतर त्यांची प्रगती खरोखरच थक्क करणारी आहे. अब्जाधिश होण्यासाठी त्यांना बरेच काय काय करावे लागले असेल? आज ते आणि त्यांची मुले उद्योगपती आहेत, अगदी मुकेश-अनिल अंबानी यांच्यासारखी, निलेश-नितेश राणे यांच्या उद्योगाचे साम्राज्य महाराष्ट्रात सर्वदुर पसरले आहे, हे स्वत: नारायण राणे यांनी त्यांच्याच भाषणात सांगितले आहे. पण काय उद्योग आहेत हे मात्र ते सांगायला विसरले असावेत. आता राणे बोललेच आहेत, तर यथावकाश त्यांच्या मुलांचे उद्योगही जनतेलाही कळून येतील. कुडाळनंतर नारायण राणे यांचा राष्ट्रवादी वस्त्रहरण नाटयाचा दुसरा प्रयोग पुण्यात ८ तारखेला रंगणार आहे, त्यानंतर सांगलीत देखील या नाटयाचा प्रयोग होणार आहे. या प्रयोगांना हर्षवर्धन पाटील व पतंगराव कदमही उपस्थित राहणार असल्याचे विश्वसनिय सुत्रांकडून समजते.

आपल्या मनातील प्रश्नांच्या उत्तरासाठी
www.saamsatta.com

## आणि आपटून पडा'

आमच्या बालेकिल्ल्यातील प्रभागही सोडले नाहीत. आता कार्यकर्त्यांना आम्ही काय सांगणार'? असा नाटकी सवाल आठवले यांनी केला आहे. पण आठवले, तुम्ही तुमच्या कार्यकर्त्यांना काही सांगण्याची गरजच नाही. लाचार फौज आपल्या लाचार सेनापतीला कधीही काहीही विचारत नसते. या फौजेला आपल्या नेत्याची सारवासारव नीट ठाऊक असते. त्यांच्या अनुभवानुसार, आठवले यांनी नाटकी सवाल बोलून झाल्यावर त्याच दमात सारवासारव केलीसुध्दा. 'आता ज्या जागा मिळाल्या आहेत त्या जिंकण्याचा आम्ही प्रयत्न करू' ही अशी सारवासारव करणे हेच आठवले यांचे लोटांगणवादी राजकारण आहे. त्यांचा त्रागा खरा नसतो. स्मशानवैराग्याप्रमाणे तो असतो हे त्यांचे काल ज्यांच्याशी व आज ज्यांच्याशी म्होतूर आहे त्या सर्व नेत्यांना नीट व पक्के माहीत आहे. यामुळेच ही नेतेमंडळी 'आमच्या पक्षाला योग्य न्याय दिला गेला नाही' या आठवले यांच्या नेहमीच्या तक्रारीला मुळीच महत्त्व देत नाहीत. शिवाय, न्याय हा मागून मिळत नसतो. तो भांडून, आपली ताकद दाखवून मिळवावा लागतो. तसेच 'सेना-भाजपाची सामाजिक उत्तरदायित्त्वा बद्दलची भूमिका संशयास्पद वाटते' असा संशय ढसाळांनी व्यक्त करूनही न्याय मिळत नसतो. ढसाळ यांनी सेनेशी कधीच केलेल्या युतीचे आता कसेही समर्थन केले तरी ते कुणालाही पटणार नाही. ते म्हणाले, 'शिवसेनेच्या अजेंड्यावर जाती अंत्य विषय यावा यासाठी आपण सेनेशी राजकीय युती केली. परंतु त्याची त्यांना कदर नाही' ढसाळ, कवी मनाच्या एकेकाळच्या पँथरने गवतही खाणे मुकाट्याने मान्य केल्याची ही शोकांतिका आहे. प्रकाश आंबेडकर, नामदेव ढसाळ व रामदास आठवले आदी दलित नेत्यांनी एकजूट टिकवून पक्ष वाढविला नाही आणि आपलेच दुकानदारीचे कोते राजकारण केले. त्यामुळे ही केविलवाणी अवस्था आहे. प्रत्येक लोकसभा व विधानसभा निवडणुकीत पडद्याआड सौदेबाजी करणारे प्रकाश आंबेडकर यांनी आता उघडपणे काँग्रेसशी आघाडी केली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित समाज सत्ताधारी वर्ग व्हावा हे स्वप्न पाहिले होते. त्या महत्त्वाकांक्षेपासून सर्व दलित नेते किती दूर व भरकटले आहेत, हे त्यांचे संग-असंगाशी केलेल्या युत्यावरुन दिसून येते.

## राष्ट्रपती....

काम चोख बजावले तर एक राष्ट्र म्हणून सर्वच समस्यांचा आपण यशस्वीरित्या निपटारा करु, असेही त्यांनी यावेळी सांगितले. आपल्या भाषणात राष्ट्रपतींनी अनेक विद्यमान प्रश्नां चा ऊहापोह केला. तसेच, देशवासियांना मार्गदर्शन केले.

## नाबार्ड...

सुरू झाल्यास या बँकांच्या देशभरातील ४ हजार ५८२ शाखांनाही फायदा होईल. विप्रो लिमिटेडशी झालेला करार ३१ डिसेंबर २०१७पर्यंत वैध राहणार आहे. या काळात कोअर बँकिंग प्रणालीवर बँकांकडे असलेला सर्व ग्राहक तपशील टाकला जाणार आहे. ही कोअर बँकिंग सेवा करार झालेल्या चार बँकांच्या, राज्यातील ५०० शाखांतून येत्या वर्षभरात सुरू होईल असे नाबार्डने प्रसिद्ध केलेल्या पत्रकात नमूद केले आहे.

## 'घालवून दाखवणार'

घातल्याशिवाय राहणार नाही, असेही सिंह यांनी सांगितले.

मुंबई महापालिकेत १५ वर्षे सत्ता मिळाल्यानंतरही यांना पाण्याचे, रस्त्याचे, आरोग्याचे तसेच शिक्षणाचे प्रश्न का सोडवता आले नाहीत. मुंबई महापालिकेचा कॅन्सरसाठी राखीव असलेला एकमेव भूखंड यांनी सेव्हन हिल्स रुग्णालयाच्या घशात घातला. शिवसेना कार्याध्यक्ष उद्धव यांनी या पंचतारांकित रुग्णालयाची पायाभरणी केली, मात्र हे रुग्णालय वेळेत बांधले गेले नाही. एवढेच नव्हे तर आज येथे पालिकेबरोबर करार होऊनही गरीब रुग्णांना पालिकेच्या दराने उपचार मिळत नाहीत. पालिकेचे अधिकारीच हतबलतेने आयुक्तांना अहवाल पाठवतात की, येथे येणाऱ्या गरीब रुग्णांकडे अनामत रक्कम मागितली जाते, सीटी स्कॅनसाठी पालिका बाराशे रुपये आकारत असताना येथे साडेपाच हजार रुपये आकरले जातात. कोठे गेले यांचे 'करून दाखवले'?. यांनी मुंबई विकण्याचे काम केले. कंत्राटदारांच्या घशात मुंबई घालून मुंबईची वाट लावली. यामुळेच गेली अनेक वर्षे अर्थसंकल्प सादर होऊनही ताळेबंद तयार होत नव्हता. लेखापरीक्षणाचे अहवालही गेल्या पाच वर्षांमध्ये सादर झालेले नाहीत. लेखापरीक्षणाचे अहवाल आले असते, तर यांच्या भ्रष्टाचाराची असंख्य प्रकरणे बाहेर आली असती. म्हणूनच आज शिवसेना राज्य शासनाकडून पालिकेत नियुक्त केल्या जाणाऱ्या लेखापरीक्षकाला विरोध करत आहे. २००७ सालानंतर पालिकेच्या लेखापरीक्षकांनी आपला अहवालच स्थायी समितीत सादर केला नाही. पण २००७च्या अहवालात आर्थिक अनियमिततेची असंख्य प्रकरणे देण्यात आली आहेत. २००२ ते २००७ या काळात अर्थसंकल्पात भांडवली कामांवर जी हजारो कोटी रुपयांची तरतूद दाखवली आहे त्यापैकी निम्मी रक्कमही खर्च झालेली नाही.

गेल्या पाच वर्षांच्या युतीच्या काळात केलेल्या कामांची मोठी जाहिरातबाजी शिवसेनेने उद्धव ठाकरे यांचे छायाचित्र टाकून केली, माझा प्रश्न आहे केवळ उद्धव यांच्या शिवसेनेनेच विकास केला का? भाजपचा त्यात काहीच सहभाग नव्हता का? शिवसेना-भाजपने गेल्या पाच वर्षांत मुंबईची पुरती वाट लावली असल्याने त्यांनी पालिका निवडणुकीत आता 'वचननामा' जाहीर करण्याएवजी 'भकासनामा' जाहीर करावा. झोपडपट्ट्यांमध्ये नागरी सुविधांची बोंब आहे. ३५ हजार टॉयलेट ब्लॉक्स केले जाणार होते. २०१२ पर्यंत ते पूर्ण होणे अपेक्षित होते. हिम्मत असेल तर किती टॉयलेट बांधली हे युतीने जाहीर करावे मगच मत मागावे. मागील पालिका निवडणुकीत काँग्रेस-राष्ट्रवादी पक्ष स्वतंत्रपणे लढला होता. आमची एकत्रित मते १४ लाख एवढी होती, तर युतीला बारा लाख मते मिळाली. आता काँग्रेस-राष्ट्रवादीची आघाडी असल्यामुळे काँग्रेसला शंभरहून अधिक जागा मिळतील, तर आघाडी शंभर टक्के महापालिकेवर झेंडा फडकवल्याशिवाय राहणार नाही.

## भारताची चिंता.....

अरेबिया व आखाती देशांतून आयात होते. देशाच्या एकूण गरजेपैकी ७० टक्के खनिज तेलाची सध्या आयात होत आहे. २०२० मध्ये ते प्रमाण ९६.६ टक्के होण्याची शक्यता आहे, यावरून ऊर्जा सुरक्षेचे महत्त्व ध्यानात घ्यावयास हवे, असे निरीक्षकांचे मत आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, कारवाई करण्यासाठी इस्राईल अमेरिकेच्या इशाऱ्याची प्रतीक्षा करीत आहे, तर पर्शियन आखातात 'डेरिंग' ही अत्याधुनिक युद्धनौका पाठविण्याची घोषणा अलीकडे ब्रिटनने केली आहे. येत्या काही महिन्यांत तणाव शिगेला पोचण्याची शक्यतता असून, पर्याय म्हणून भारताने सीरिया, रशिया, व्हिएतनाम व म्यानमारकडे चाचपणी चालविली आहे. सुदान व नायजेरियातील खनिज तेल क्षेत्रात भारताने केलेल्या ७५० दशलक्ष डॉलरच्या गुंतवणुकीचा लाभही भारताला मिळण्याची शक्यजता आहे.

## भारत चीनच्या मागे

होती. मात्र, आता पंतप्रधान मनमोहनसिंह यांनी याकडे लक्ष वेधले आहे. नुकत्याच झालेल्या इंडियन सायन्स काँग्रेसमध्ये त्यांनी 'झेटा स्केल' सुपर संगणकाच्या निर्मितीची घोषणा केली आहे. हा प्रकल्प 'सायन्स एडव्हायजरी कौन्सिल'चे सीएनआर राव यांच्या मदतीने राबविण्यात येणार असून, पाच हजार कोटींची तरतूदही करण्यात येणार आहे. मात्र, या प्रकल्पासाठी तब्बल चार हजार मेगावॉट विजेची आवश्यकता आहे. सध्या भारतात विजेचा तुटवडा आहे. त्यामुळे तो प्रकल्प २० मेगावॉटपर्यंत आणण्यासाठी संशोधन सुरू आहे. हे संगणक तयार झाल्यास तब्बल एक किलोमीटर अंतरावर हवामानाची माहिती मिळणार आहे. याशिवाय विद्यापीठ, संशोधन, तेल, माइन्स, रक्षा, अंतराळ अगदी चांद्रयाणसारख्या प्रकल्पात त्याचा उपयोग होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# जाती पातीचे आरक्षण हवेच कशाला-राज ठाकरे



मुंबई, :(सी.एन.आय)
जातपात गाडून टाकण्याचे आवाहन करणारेच निवडणुकांमध्ये प्रभागांसाठी जातीचे आरक्षण करताहेत. एखाद्याकडे माणूस म्हणून न बघता कोणत्या जातीचा आहे हे पाहिले जात आहे. तो एस.सी., एस. टी, ओबीसी असला तरी त्याकडे मराठी माणूस म्हणून बघायला शिका. मराठी माणसांसाठी जातीपातीचे आरक्षण हवेच कशाला? असा सवाल मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज उपस्थित केला. कृष्णकुंज येथे राज ठाकरे यांनी पत्रकार परिषदेत मुंबई, ठाणे, नाशिक आणि पुणे येथील उमेदवारांची यादी जाहीर केली. मनसेने घेतलेल्या परीक्षेमध्ये मिळालेले गुणही उमेदवारांच्या नावापुढे देण्यात आले आहेत. यावेळी बोलताना ते म्हणाले, मनसेला लोकसभा, विधानसभा निवडणुकीत मतदारांनी मोठा प्रतिसाद दिला होता. मनपा निवडणुकीतही ते आमच्यासोबत राहणार असून, माझ्या पक्षाचे अनेक उमेदवार विजयी होतील. त्यामुळे मी आता किंगमेकरची नाही तर किंगची भूमिका असेल. तसेच महापौर (पान ८वर)

# अन्न सुरक्षा विधेयकाची अंमलबजावणी कठीण' -शरद पवार



नवी दिल्ली' :(सी.एन.आय):
केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी अन्न सुरक्षा विधेयकावर कृषी मंत्री शरद पवार यांनी पुन्हा एकदा शरसंधान केले आहे. कृषी मंत्रालयाला पुरेसा निधी उपलब्ध करून न दिल्यास या विधेयकाची अंमलबजावणी करणे कठीण आहे, असे ते म्हणाले. एका खासगी उपग्रह वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी हे मत व्यक्त केले. या विधेयकाला माझा विरोध नाही मात्र केवळ एका गोष्टीकडे मी लक्ष वेधू इच्छितो. केंद्रीय अर्थसंकल्पात कृषी खात्याच्या वाट्याला २० हजार कोटी रुपयांचा निधी येतो, त्याव्यतिरिक्त आजच्या घडीला ६५ हजार कोटी रुपयांची सवलत या खात्याला मिळाली आहे. या वर्षअखेरीपर्यंत हा आकडा एक लाख कोटी रुपयांपर्यंत जाण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर कृषी उत्पादनात लक्षणीय वाढ होत नाही तोपर्यंत या विधेयकाची अंमलबजावणी होणे कठीण आहे, असे ते म्हणाले. देशातील जवळपास ६४ टक्के नागरिकांना माफक दरात अन्न पुरवठ्याचा कायदेशीर अधिकार देणारे हे विधेयकावर पवार यांनी यापूर्वीही टीका केली होती.

# अल्पसंख्याक धर्माच्या व्याख्येवर चर्चा करा - मुरली मनोहर जोशी



लखनऊ :(सी.एन.आय) मुस्लिमांना आरक्षण देण्याच्या सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत भाजपचे ज्येष्ठ नेते मुरली मनोहर जोशी यांनी धार्मिक अल्पसंख्याकांच्या मुद्द्यावर चर्चा करण्याची मागणी मुरली मनोहर जोशी केली.
सरकार ओबीसींच्या कोट्यामध्ये मुस्लिमांना ४.५ टक्के आरक्षण देत आहे. या गोष्टीचा काय उपयोग होणार, असा सवाल जोशी यांनी केला. धर्मनिरपेक्ष राज्यव्यवस्थेमध्ये धार्मिक अल्पसंख्याक या बाबीला महत्त्व असत नाही. त्यामुळे अल्पसंख्याक कोणाला म्हणायचे यावर चर्चा होणे आवश्यक असल्याचे जोशी यांनी सांगितले. यामध्ये दोन गोष्टी महत्त्वाच्या आहेत. एक (पान ८वर)

# भारतातली मानवी हक्कांची स्थिती चिंताजनक

नवी दिल्ली, :(सी.एन.आय)
पोलीस कोठडीत होणारे आरोपींचे मृत्यू, धोरणांच्या अमलबजावणीमध्ये आलेले अपयश आणि दुर्बल घटकांना पुरेसे संरक्षण देण्यात झालेली कसूर यामुळे मानवी हक्कांच्या बाबतीत २०११मध्ये भारताची अवस्था दारुण असल्याचं ह्युमन राइट्स वॉचच्या अहवालावरुन दिसून आले आहे. सुरक्षा दलांकडून स्थानिकांवर होणारे अत्याचार २०११ मध्ये आधीच्याच वेगाने सुरू असल्याचे या अहवालात म्हटले असून विशेषत: जम्मू व काश्मिर, ईशान्य भारत व माओवाद्यांचे प्राबल्य असलेल्या भागात ही बाब प्रकर्षाने जाणवते.अर्थात सीमा सुरक्षा दलाकडून भारत-बांगलादेश सीमेवर मारल्या जाणा-या नागरिकांच्या संख्येत मात्र कमालीची घट झाल्याचेही नमूद करण्यात आले आहे. प्रचंड लोकसंख्या असलेल्या भारतामध्ये प्रसारमाध्यमे सतर्क आहेत, नागरी संघटना कार्यक्षम आहेत, न्यायालयीन यंत्रणा आदरास पात्र आहे परंतु मानवी हक्कांच्या बाबतीत भरपूर समस्या आहेत असे वर्णन भारताचे करण्यात आले आहे.
मानवी हक्कांचे उल्लंघन करण्याची अनुमती देणाऱ्या धोरणांना व कायद्यांना मागे घेण्यात भारत अपयशी ठरल्याचे निरीक्षण नोंदवताना गंभीर गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्यांना अटक करण्यातही कुचराई होत असल्याकडे या अहवालात लक्ष वेधण्यात आले आहे.
अशांतता असलेल्या भागामध्ये सैन्याला प्रचंड हक्क देणारा आर्म्ड फोर्सेस स्पेशल पॉवर्स एक्ट किंवा आफ्स्पा रद्द करण्यात येऊ नये यासाठी भारतीय सैन्याकडून जोरदार विरोध झाल्याचे (पान ८वर)

# प्रयोग करा, पण फक्त काँग्रेसचाच: विलासराव देशमुख



कोल्हापूर, ':(सी.एन.आय)
'जिल्हा परिषदे पंचायत समितीच्या निवडणुकीत कोणताही प्रयोग करू नका, प्रयोग करायचाच असेल तर तो फक्त सोनियांचा करा, काँग्रेसचा करा'असे आवाहन स्थानिक नेत्यांना उद्देशून केंद्रीय मंत्री विलासराव देशमुख यांनी आज करवीर तालुक्यातील शिरोली दुमाला येथील जाहिर सभेत बोलताना केले.
कोल्हापूर जिल्ह्यातील नेते कधीही एकत्र बसत नाहीत परंतू आज प्रचाराच्या शुभारंभाच्या सभेत सगळे दिग्गज एकत्र बसले आहेत.मला त्याचा व्यक्तीश: आनंद आहे. आता मला शंभर टक्के खात्री आहे. शाहूंच्या भुमीत नारळ फुटला, त्याच्या पाण्यावर आता दुसरं कुठलंही पीक उभारणार नाही असे देशमुख म्हणाले.
आ.महादेवराव महाडिक यांचे देशमुखांनी कौतुक केले. निवडणूकीची चावी हातात असलेले महाडिक आता सोबत आहेत. त्यामुळे आता कसलीच काळजी करण्याची आवश्यकता नाही,असे सांगत देशमुख म्हणाले की, चांगल्या कार्यकर्त्यांवर अन्याय करू नका. पक्षाने दिलेल्या उमेदवारांना पुढे येऊ द्या. त्याला अडविण्याचा प्रयत्न झाला तर नुकसान आपले होते. मागचे सगळे विसरुन जा आणि नवा विचार करा. काँग्रेसचा विचार करा.'असे ते म्हणाले. मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण हाच धागा पकडून म्हणाले की,'पी. एन. पाटील यांनी आपापसातील मतभेद मिटवत आणले आहेत. एकदोन ठिकाणचेही मिटवा. जिल्हा परिषदेवर काँग्रेसची एकसंध सत्ता आणण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत. आजची ताकद पाहिली तर निवडणूक निर्णायक होणार यात शंकाच नाही.'

# काकांच्या कष्टाची फळे पुतणे खातात

मुंबई:(सी.एन.आय)
भाजप नेते गोपीनाथ मुंडे यांचा त्यांच्याच पुतण्याने परळीत पराभव केल्यानंतर गोपीनाथरावांच्या दु:खावर फुंकर घालण्याचे काम शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी सामन्यातून केले, ते 'पुतणेगिरी'च्या अस्वस्थ अनुभवातून. 'राज'कारणातील विठ्ठल आणि बडव्यांची फॅक्टरी पाहून तो पंढरपूरचा विठोबाही चाट पडला असेल असाही खोचक टोमणाही त्यांनी लगावला आहे.
आता घराणेशाहीपेक्षा पुतणेशाहीला अकारण महत्त्व निर्माण झाले. प्रत्येक पुतण्या हा काकांभोवती कसे बडवे निर्माण झाले व या बडव्यांनी काकारुपी विठ्ठलाला घेरले आहे अशी टाळकुटी करीत बंडाचे निशाण उभारत असतो. विठोबाचा उदो उदो करीत बडव्यांच्या विरोधात बंड केले, पण शेवटी खंजीर तर काकांच्याच पाठीत खुपसलास ना? काका राजकारणात, समाजकारणात, सत्ताकारणात मजबुतीने उभे राहिले. त्यांनी संघर्ष, कष्ट केले. दिवसरात्र मेहनत घेतली म्हणून पुतणे चमकले. म्हणजे काकांच्या वैभवाच्या काळात बडवेगिरी करण्यात पुतणे म्हणून आपणही आघाडीवर होताच ना?. कधी व्यथित सुरांचा तर कधी संतापाचा लाव्हा शिवसेनाप्रमुखांच्या शब्दातून उमटत होता. मुंडे यांचे पुतणे धनंजय यांनी केलेल्या बंडाचे निमित्त साधून शिवसेनाप्रमुखांनी 'लेकी बोले सुने लागे' न्यायाने राज ठाकरे यांनाच सुनाविले आहे. काकांच्या कष्टाची फळे पुतणे खात असतात हे सत्य आहे. मुंडे यांना पुतणेशाहीचा जो खुनशी अनुभव आला त्यामुळे त्यांच्या मनास जबरदस्त यातना झाल्या असतील. राजकारणातील या पुतण्यालाही मुंडे यांनी अंगाखांद्यावर खेळवले असेल, मांडीवर बसवून प्रेमाचे घास भरवला असेल, अत्यंत विश्वासाने त्याच्यावर विसंबून राहाता येतील असे त्याचे खांदे घडवले असतील, पण ज्या खांद्यावर विश्वासने डोके ठेवावे तेच खांदे बेईमान झाल्यावर विश्वास या शब्दाला काही अर्थच राहात नाही.
महाराष्ट्राच्या राजकारणात दोन पुतण्यांनी मिळून काकांचा 'गेम' केला, अशी बाळासाहेबांची व्यथा आहे. महाराष्ट्रातील एक मातब्बर पुतणे अजित पवार यांच्यामुळेच धनंजयला बेईमानी करण्याची प्रेरणा मिळाली असे आता गोपीनाथरावांनी म्हटले. मात्र आम्हाला तसे वाटत नाही. अजित पवार तर परके, पण पुतणे धनंजय तर रक्ताचे होते. त्यांचे मन का भ्रष्ट झाले? त्यांची नियत का बिघडली? पुतण्यास बेईमानी करण्याचे 'बळ' देणारे हात स्वगृहातही आहेत काय याचा शोध घेण्याचे आवाहनही शिवसेनाप्रमुखांनी केले आहे.आषाढी कार्तिकी नसतानाही पुतणे विठ्ठलाचा गजर करू लागले आणि बडव्यांचा धिक्कार करू लागले! आता पुतण्याच्या रुपाने नवे विठ्ठल व नवे बडवे तयार होतील. मात्र पंढरपूरचा विठोबा एकच. तो या राजकारणातील विठोबा आणि बडव्यांना बघून चाट पडला असले, असेही बाळासाहेबांनी म्हटले आहे.

# भ्रष्टाचार विरुद्ध आंदोलनात सहभागी व्हावे : रामदेव बाबा

सिरसा, (सी.एन.आय)
''परमेश्वराला मानणाऱ्यांनी देश भ्रष्टाचारमुक्त करण्यासाठी आंदोलनात सहभागी व्हावे. असे आवाहन योगगुरु रामदेव बाबा यांनी देशवासियांना केले आहे. मी या देशाला भ्रष्टाचाराच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी जनजागृतीचा लढा उभारला आहे, असे वक्तव्य रामदेव बाबा यांनी केले आहे. प्रत्येक मनुष्यात परमेश्वर आहे. असे असतानाही काही लोक परमेश्वराला मानतात आणि काही त्याची निंदा करतात. आपल्यातील परमेश्वराला जागे करा, म्हणजे तुमची प्रवृत्ती आणि मन स्वच्छ होईल, असे रामदेव बाबा यांनी सांगितले. माझा हा लढा भ्रष्टाचाराविरोधात आहे. जे लोक परमेश्वसराला मानतात त्यांनी माझ्या लढ्यात सहभागी व्हावे आणि देशाला भ्रष्ट राजकारण्यांच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी सहकार्य करावे आणि यासाठी जो उमेदवार भ्रष्ट नाही त्याला निवडून द्या, असेही त्यांनी यावेळी बोलताना सांगितले.

# दिवसाला ३८० कॅलरीज कमी करणारी गोळी

लंडन :(सी.एन.आय)
वजन कमी करण्यासाठी आता इंग्लडमध्ये गोळी तयार करण्यात आली असून दिवसाला ३८० कॅलरिज कमी करण्याची क्षमता या गोळीत आहे. ४० मिनिटे धावल्यानंतर जितकी कॅलरीज बर्न होऊ शकते तितकी ही क्षमता आहे. ही गोळी फक्त कॅलरीज बर्न करून वजन कमी करते असे नाही तर एनर्जी वाढवण्याचे कामही करते. 'वैद्यकीय परीणात हे सिद्ध झाले असल्याचे जर्मनीचे शास्त्रज्ञ डॉ. अल्फ्रेड हासूेब्रेचरने यांनी सांगितले.
या गोळीचा ६५ लोकांवर प्रयोग करण्यात आला. त्याची भूक ७८ टक्क्यांनी कमी झाली आणि अतिरिक्त २० टक्के फॅट कमी झाले तेही आठ दिवसांत. ९० टक्के लोकांचे वजन कमी झाले. ३० गोळयांच्याची किंमत ३५.९५ पौड (सुमारे २८०० रुपये) इतकी आहे. रोज एक गोळी ब्रेकफास्टनंतर घ्यायची. लंडनमध्ये ही गोळी बाजारात आल्यानंतर एका तासात सगळा स्टॉक संपला. आणखीन ५० हजार गोळयांची आगाऊ नोंदणी झाली आहे. अमेरिकेत ऑक्टोबर महिन्यात ही गोळी बाजारात येणार आहे.

## पोलिसांच्या अब्रूची लक्तरे

भटकळ पळून गेल्याचे उजेडात आणताच, खळबळ उडाली. याबाबत मुंबईचे पोलीस आयुक्त आणि विशेष पोलीस पथकाचे प्रमुख राकेश मारिया यांनी कोणताही खुलासा केलेला नाही. पण गृहमंत्री आर. आर. पाटील यांनी मात्र मुंबईतल्या बॉंबस्फोटाचा तपास विशेष पोलीस पथकाकडून योग्य रितीने आणि दिशेने सुरू असल्याची ग्वाही दिली. कटाचा सूत्रधार पळून गेल्यावर हे पथक योग्य दिशेने तपास करीत असल्याचा त्यांचा दावा मुळीच पटणारा नाही. दिल्ली पोलिसांचे पथक, मुंबई पोलीस आणि विशेष चौकशी पथकांचा परस्परांशी कसलाही आणि काहीही समन्वय नसल्यानेच देशाचे हे शत्रू पळून जाण्यात यशस्वी झाले. पोलिसांच्या प्रतिमेला डांबर फासून गेले, ही वस्तुस्थिती पोलिसांची सातत्याने भलावण करणारे गृहमंत्री आर. आर. पाटील सोयिस्करपण विसरत आहे.

## पत्रकार संरक्षण कायदा

वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

मसुद्याचा तपशील जाहीर झाल्यानंतर काही महिन्यांतच कायदा अस्तित्वात येईल, असे बहुतांश संपादक आणि पत्रकार मंडळींना वाटले होते. आश्चर्य म्हणजे त्यानंतर ज्यावेळी आणखी पत्रकार आणि वृत्तपत्रांच्या कार्यालयांवर हल्ले झाले, त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी सर्व राजकीय पक्ष हा कायदा होण्याच्या विरोधात आहेत, असे सांगत हे विधेयक मांडण्यास असमर्थता दर्शवली.

नोव्हेंबर २०१०मध्ये आदर्श प्रकरणामुळे अशोक चव्हाण यांना पद सोडावे लागले आणि पृथ्वीराज चव्हाण यांनी पदभार स्वीकारला. सुरुवातीला पृथ्वीराज चव्हाणदेखील या कायद्याबाबत अनुकूल होते, मात्र त्यांच्याकडून कोणतेही आश्वासन मिळालेले नाही. पत्रकारांवरी हल्ले रोखणाऱ्या विशेष कायद्याचा प्रस्ताव अभ्यासण्यासाठी पृथ्वीराज चव्हाण यांनी उद्योगमंत्री नारायण राणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. आपण या विशेष कायद्याचे समर्थन करत असल्याचे पृथ्वीराज चव्हाण म्हणत असले, तरी त्याचे कायद्यात रुपांतर व्हावे, यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले नाहीत. राजकारण्यांविरोधात या कायद्याचा गैरवापर होऊ शकतो, असे कारण देत राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि शिवसेनेच्या वरिष्ठ नेत्यांनी प्रस्तावित कायदयाला विरोध केला. तर गृहमंत्री आर. आर. पाटील आणि विरोधी पक्षनेते एकनाथ खडसे यांनी या कायद्याला पाठिंबा दिला. कायदा न आणण्यामागे त्याचा गैरवापर होईल ही भीती बाळगणे योग्य ठरणार नाही. पत्रकारांवरील हल्ल्यांबाबत सरकार गंभीर असेल, तर हा कायदा लवकरात लवकर आणला पाहिजे,' असे एकनाथ खडसे म्हणाले.

## बहुजन विकास आघाडी

हितेंद्र ठाकूर स्पष्ट बोलायला तयार नाहीत. खासदारांनी काय भूमिका घेतली, हे मला माहित नाही. मात्र, आमची आघाडी राष्ट्रवादीत जाणार, हे मला पत्रकारांकडूनच कळले, असे ठाकूर म्हणाले. बहुजन विकास आघाडीची वसई-विरार महापालिकेत बहुमताची सत्ता आहे. तसेच पक्षाचे नालासोपारा येथे क्षितिज ठाकूर आणि बोईसर येथे विलास तरे या दोन आमदारांसह पांडुरंग पाटील हे जि.प. सदस्य आहेत. जिल्हा परिषद निडणुकीत या बळाचा वापर करुन घेण्यासाठी राष्ट्रवादीने असे पाऊल उचललेले आहे असे समजते. हिंतेंद्र ठाकूर यांनी देखील आपल्या मुलाचे उद्याचे राजकिय भवितव्य सुनिश्चित करण्यासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये जाण्याचा निर्णय घेतल्याचे समजते.

## राज ठाकरे

म्हणून कोणाला पाठिंबा नाही, तर माझा महापौर मीच ठरविणार असल्याचे सांगून मुंबईत मनसेचीच सत्ता येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या निकालाआधीच शिवसेना मनातून हरली असल्यानेच काल एका वर्तमानपत्राच्या कार्यालयावर हल्ला करण्यात आल्याची टीका करून ते म्हणाले, शिवसेनेच्या मुखपत्र सामनातून राजकीय विरोधकांना कोणत्याही भाषेत काहीही लिहिले तर चालते. टीका झालेल्या व्यक्तीने सामनात खुलासा पाठवला तर तो छापला जात नाही. पण, एखाद्या दैनिकात त्यांच्या विरोधात काही छापून आले तर ते मात्र झोंबते. तोडफोड करून निषेध करण्याची ही त्यांची कोणती पद्धत, असा सवाल उपस्थित करत कार्यालय फोडणे हा निषधेचा मार्ग असूच शकत नाही. ही शिवसेनेची शिवशाही नसून मोगलाई असल्याची खरमरीत टीकाही त्यांनी केली. राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत पुढील लोकसभा निवडणूक लढणार नसल्याचे सांगितले. परंतु ते यापूर्वीही तसे बोलले होते. त्यावेळी त्यांनी बारामतीमधून नाही, तर माढामधून लोकसभा लढविली होती. आताही ते निवडणूक लढवणार नसल्याचे बोलत असले तरी ते बोलतात एक आणि करतात भलतेच. म्हणूनच ते त्यांच्या विधानावर ठाम राहतील, असा विश्वास आपल्याला वाटत नसल्याचे त्यांनी सांगितले.

## मुख्यमंत्री....

झालेल्या चुकांची पुनरावृत्ती होणार नाही याची खबरदारी घेतली पाहिजे. देशात आणि राज्यातही कॉंग्रेसचे सरकार आहे. विकासाची हीच साखळी ग्रामीण भागात पोचवण्यासाठी जिल्हा परिषदेवर कॉंग्रेसची सत्ता महत्त्वाची आहे. ही ताकद चुकीच्या माणसाकडे गेली तर विकास खुंटेल याची काळजी घ्या."

ते पुढे असेही म्हणाले की, "चुकीचा कारभार केलेल्या राज्य बॅंकेसह अनेक साखर कारखान्यात काय झाले हे सर्वांनाच माहीत आहे. गैरव्यवहार करणाऱ्यांची यापुढे गय केली जाणार नाही. भ्रष्टाचाऱ्यांच्या या टोळ्या हद्दपारच केल्या जातील. केंद्र सरकारने कोरडवाहू जमिनींसाठी दहा हजार कोटींचा निधी जाहीर केला आहे. हा सर्व निधी जिल्हा परिषदेच्या यंत्रणेमार्फत ग्रामीण भागापर्यंत पोचणार आहे. जिल्हा परिषद निवडणुकीत आपली स्पर्धा कोणाशी हे आपल्याला माहीत आहे, त्यामुळे कृपा करून नेत्यांनी पक्षापेक्षा स्वतःला मोठे समजू नये. आपापसातील मतभेद बाजूला ठेवून कॉंग्रेसला एकहाती सत्ता मिळवून द्या."

केंद्रीय मंत्री विलासराव देशमुख म्हणाले, "अडीच वर्षांनंतर आपण कोल्हापुरात आलो आहोत. त्यावेळी झालेल्या विधानसभा निवडणुकीत होतकरू, काम करण्याची व निधी आणण्याची धमक असलेले पी. एन. पाटील, मालोजीराजे छत्रपती, प्रकाश आवाडे पराभूत झाले. त्याचे शल्य मनात असल्याने इकडे यावेसे वाटले नाही. या पराभवाचा वचपा काढायचा असेल तर जिल्हा परिषदेवर कॉंग्रेसचा झेंडा फडकवा."

ते म्हणाले, "राज्यात आणि केंद्रातही कॉंग्रेसचीच सत्ता आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेवर सत्ता आली तर थेट गावांपर्यंत पैसा पोचणार आहे, पण त्याच जिल्हा परिषदेत भलतीच माणसं बसली तर विकासाला खिळ बसल्याशिवाय राहणार नाही. पक्षाची जिल्ह्यातील ताकद वाढली आहे. व्यासपीठावरील दिग्गजांवर नजर टाकली तर कधी नव्हे ते सर्व एकत्र, एका व्यासपीठावर आल्याचे आढळते. त्यामुळे जिल्हा परिषदेवर कॉंग्रेसचाच झेंडा फडकणार याची खात्री आहे."

मुख्यमंत्री चव्हाण व सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी घेतलेल्या कठोर निर्णयाने भल्याभल्यांची झोप उडाल्याचे सांगत श्री. देशमुख म्हणाले, "सहकारात भ्रष्टाचार वाढला तर मग सहकारालाच घरघर लागायला फार वेळ लागत नाही. ही दुष्ट प्रवृत्ती बाहेर काढण्याची मोहीम हाती घेतली आहे. यातून नवा महाराष्ट्र उभा करायचा आहे, याची जाणीव कोल्हापूरकरांनी ठेवून जिल्हा परिषदेची सत्ता कॉंग्रेसला द्यावी." असे अव्हानही विलासराव देशमुख यांनी यावेळी केले.

## पवार काका-पुतण्या

काका आहोत, हे शरद पवार यांनी दाखवून दिले. त्याचवेळी परस्परांचे नुकसान न करण्याचा अलिखित करार मोडणाऱ्या शिवसेना कार्याध्यक्ष उद्धव ठाकरे यांनाही त्यांनी ताळ्यावर आणले. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी मैत्रीचा धर्म पाळत परस्परांना न सांगता इजा करायची नाही हा केलेला अलिखित करार त्यांचे चिरंजीव शिवसेना कार्याध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी तोडला आणि स्वतःच्या पायावर धोंडा पाडून घेतला. मुंबईच्या वाटाघाटीत राष्ट्रवादीने नेहमी-प्रमाणे ताणून धरलेले असताना शिवसेनेने ठाण्यातील राष्ट्रवादीचे आमदार सुभाष भोईर आणि काही नगरसेवकांना फोडले. नगरसेवकांना घ्या पण, विधानपरिषद सदस्य सुभाष भोईर यांना सेनेत प्रवेश देऊ नका, असा निरोप स्वतः पवार यांनी एका बड्या नेत्यामार्फत उद्धव ठाकरे यांना पाठवला होता. पण कार्याध्यक्षांनी ते ऐकले नाही. याचा व्हायचा तो परिणाम झाला. मुंबईतील आघाडीला तर वेग आलाच पण मुंबई-ठाण्यातील शिवसेनेचे एकमेव खासदार आनंद परांजपे यांनाच फोडून शरद पवार यांनी शिवसेनेला चोख प्रत्युत्तरही दिले. केंद्रात आणि राज्यात सत्ता नाही. मुंबई-ठाणे महापालिका हातात राहतील की नाही हे सांगता येत नाही.त्यामुळे आता शिवसेनेच्या भवितव्याबाबत शंका व्यक्त होत आहे. बेरजेच्या राजकारणाच्या नावाने येईल त्यांना पक्षात सामावून घेण्याच्या धोरणाने पक्षाची ताकद वाढेल की नाही हे माहीत नाही पण आतल्या लोकांची अस्वस्थता वाढते आहे. बीड जिल्ह्यात युती सरकारच्या काळात गोपीनाथ मुंडे यांनी सगळ्या पक्षातल्या नेत्यांना भाजपात आणून पक्ष मोठा केला. पण ही सूज होती वाढ नव्हे. त्यामुळे युतीची सत्ता गेल्यावर सूज उतरली. प्रकाश सोळुंके, सुरेश धस, जयसिंगराव गायकवाड असे अनेक नेते दुरावले. राष्ट्रवादीचे मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी पक्षाचा विस्तार केला. आज या जिल्ह्यातील ६ पैकी ५ आमदार राष्ट्रवादीचे आहेत व मुंडे यांच्या कन्या पंकजा मुंडे या एकमेव भाजप आमदार आहेत. भाजपाशी म्हणजेच गोपीनाथ मुंडे, त्यांचे बंधू पंडितअण्णा मुंडे व आ. धनंजय मुंडे यांच्याशी संघर्ष करून राष्ट्रवादीने तेथे आपले वर्चस्व निर्माण केले. आता ज्यांच्याशी संघर्ष केला ते पंडितअण्णा व धनंजय मुंडे राष्ट्रवादीत आले आहेत. त्यामुळे राष्ट्रवादीची घडी विस्कटू शकते. मुंडे यांच्या घरातले भांडण राष्ट्रवादीने विकत घेतले आहे. अशीच आजची स्थिती असल्याचे दिसत आहे.

## मुरली मनोहर जोशी

म्हणजे धार्मिक अल्पसंख्याक कोण आहे आणि राष्ट्राचा धर्म कोणता? असा सवालही त्यांनी केला. भाषिक अल्पसंख्याक समजू शकतो. मात्र, या देशामध्ये कोणता धर्म बहुसंख्य मानला गेला आहे? असे जोशी म्हणाले. काही राजकीय कारणास्तव एखादा समाज अन्य देशांमध्ये स्थलांतरित झाला असेल तर तो तेथील धार्मिक अल्पसंख्य असू शकतो. मात्र, भारतातील अल्पसंख्य समुदाय हा मोठया प्रमाणात धर्मांतरित झालेला आहे याकडे जोशी यांनी लक्ष वेधले. मागासवर्गीय मुस्लिमांना आधीच आरक्षण मिळाले असल्याने नव्या ४.५ टक्के आरक्षणाचा लाभ मुस्लिमांतील क्रिमिलेअरला होईल, असे मत जोशींनी व्यक्त केले. मंडल आयोगाने ठरवलेल्या मागासवर्गीय जातीमध्ये बहुसंख्य मुस्लिम समुदायांचा समावेश झाला आहे. बुनकर आणि कसाई या मुस्लिमांतील जातींना याआधीच आरक्षण लागू झाले आहे. शैक्षणिक आणि सामाजिक स्तरानुसार या जातींचा समावेश मागासवर्गामध्ये करण्यात आला आहे. त्यामुळे नव्याने आरक्षण दिल्यास त्याचा उपयोग केवळ मुस्लीमांतील क्रिमिलेअरलाच होईल, असे जोशी यांनी स्पष्ट केले. धार्मिक आधारावर आरक्षण घटनाविरोधी असून कॉंग्रेसने उत्तर प्रदेशच्या निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून हा निणऱ्य घेतला आहे, असा आरोप जोशी यांनी केला. नव्या आरक्षणामुळे मागासवर्गीय आणि मुस्लिमांमध्ये तेढ निर्माण होऊ शकते. अशी स्थिती देशाच्या हिताची नाही. भाजपने या मुद्द्यावर संसदेत विरोध केला असून संसदेबाहेर जनजागरण करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## मानवी हक्कांची स्थिती

अहवालात नोंदवण्यात आले आहे. गेल्या दोन दशकांमध्ये हजारो काश्मिरी गायब झाल्याकडे ह्युमन राईट्स वॉचने लक्ष वेधले असून या व्यक्तिंचा ठावठिकाणाही कोणाला माहित नसल्याचे म्हटले आहे. उत्तर काश्मिरमध्ये ३८ ठिकाणी २,७३० जणांच्या कबरी आढळल्या होत्या, ज्यामध्ये ५७४ मृतदेह स्थानिक काश्मिरींचे असल्याचेही उघड झाले होते. गेल्या वर्षी ही घटना उघड झाली होती. हे मृतदेह अतिरेक्यांचे असल्याचे व त्यात अनेक पाकिस्तानींचा समावेश असल्याचे सरकारने म्हटले होते. तर अनेक काश्मिरींना वाटते की काही मृतदेह सुरक्षा रक्षकांकडून मारल्या गेलेल्या काश्मिरी लोकांचे आहेत. आरोग्य व शिक्षण या दोन आघांड्यावरही फारशी प्रगती झाली नसल्याचे अहवालात नमूद केले आहे.

सामसत्ता
॥ सामर्थ्य महाराष्ट्राचे ॥

'मे.कॅनन न्युज ऑफ इंडिया ' यांच्या मालकीचे हे साप्ताहिक वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, संपादिका : **सौ.रोहिणी बापूराव काणे** यांनी हुमा ऑफसेट प्रिंटर्स, १३ म्युनिसिपल इंडस्ट्रियल इस्टेट, जेकब सर्कल, मुंबई. ४०००११, येथे छापून शॉप नं. २, परफेक्ट वॉच कंपनी, आर.बी.चांदोरकर मार्ग, आग्रीपाडा, मुंबई : ४०००११. येथुन प्रसिद्ध केले.

सहसंपादक : विनायक मुरुडकर

** www.saamsatta.com **

email : saamsatta@gmail.com / info@saamsatta.com

संपर्क दुरध्वनी : 9821968340, 9869951799, 9821958160

Post Reg.No-WG-I/MH/MR/WEST/276/2010-11.

* सर्व न्यायालयीन खटले हे मुंबई न्यायालयाच्या कक्षेतच चालतील. *

" पी.आर.बी कायद्यानुसार सर्व संपादकिय जबाबदारी सौ.रोहिणी बापूराव काणे यांची राहील. "